साऊथ इंडियन/पावभाजी/पंजाबी डिशेस/छोले भटूरे/पावभाजी/मिल्कशेक
खवय्यांसाठी खास पंजाबी
छोले भटूरे
Sambar
PURE - VEG | Aromas of South !
Restaurant Timing 8 AM to 11 PM
पार्सल सुविधा उपलब्ध..
एल.जी.शोरूम समोर, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.- 85306 40202



संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

अधिक मासातील खास स्पेशल धोंडा थाळी
पूरण पोळी, आमटी, आमरस,पनीर भाजी, सुकी भाजी, आलू रजवडी, दालफ्राय अजुन बरेच काही..
स्पेशल आमरस 400/- किलो
पार्सल सुविधा उपलब्ध
महेंद्र पेडावाला रजवाडी गुजराती थाळी
कापड बाजार, अहिल्यानगर.
रेल्वे पार्सल, किटी पार्टी व बर्थडे पार्टीसाठी खास सोय

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०९.०६.२०२६ | अंक नं. ०५९ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी | खरेदीवर पॉइंट | पॉइंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अहिल्यानगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

अधिक मास आता बनवा अधिक खास
9 जून 2026 रोजी
CKJ मधील सोन्याचा भाव
22 कॅरेट सोन्याचा भाव (प्रती ग्रॅम)
₹13899/-*
Conditions Apply*
दागिन्यांची प्रतीग्रॅम मजुरी ₹999/-*
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# पाण्यावाचून नागरिकांच्या मरणाची वाट आयुक्त पाहत आहेत का? कर भरुनही अहिल्यानगर महापालिकेकडून नियमित पुरवठा नाही

नगर – नागरिकांकडून वसूल केलेल्या पाणीपट्टीच्या बदल्यात नागरिकांना पाणी देणे ही महापालिकेची जबाबदारी आहे. मात्र, अहिल्यानगर महापालिका ही जगातील एकमेव अशी महापालिका आहे की जी लोकांकडून पाणीपट्टी वसूल तर करते, पण नियमितपणे व सर्वत्र पाणी देत नाही. वारंवार तक्रारी केल्या, तरीही गेंड्याची कातडी पांघरलेली ही महापालिकेची व्यवस्था पाणी देण्याची काहीही सोय करीत नाही. पाण्यावाचून नागरिक मेले पाहिजेत, अशी तर आयुक्त वाट पाहत नाहीत? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

महापालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १४ मधील आनंदबाग रेसिडेन्सीमधील नागरिक गेल्या अनेक महिन्यांपासून महापालिकेत पाणी मिळण्यासाठी अर्ज देत आहेत. मात्र, येथील नागरिकांना अद्याप पाणी मिळालेले नाही. २०२४ पासून पाणीपुरवठा झालेला नाही, असे येथील नागरिक सांगतात. महापालिकेला पाणी मिळण्यासाठी वारंवार अर्ज केले जात आहेत. पाणी पुरवठ्याची सर्व व्यवस्था आहे. पण तरीही जाणिवपूर्वक महापालिकेकडून या नागरिकांना पाणी दिले जात नाही, असा आरोप येथील नागरिक करीत आहेत.

पाण्यासाठी दिलेल्या अर्जांचा महापालिकेत अक्षरशः ढिग लागला असेल, एवढे अर्ज महापालिकेला दिले आहेत. मात्र, सुस्तावलेल्या अधिकाऱ्यांना लोकांना पाणी देण्यासाठी वेळ मिळत नाही. महापालिका दरवर्षी नियमितपणे लाखो रुपयांची पाणीपट्टी सक्तीने वसूल करते. मात्र नागरिकांना हक्काचे पाणी देत नाही. पाणी मिळाले नसल्याची तक्रारही आयुक्त ऐकून घेत नाहीत. वास्तविक लोकांच्या सुविधेसाठी शासनाने महापालिकेला आयुक्त नियुक्त केले. मात्र, हे आयुक्त ठराविक लोकांच्या सुविधेसाठी राबत आहेत. इतरांना साधे पाणी देण्याची तसदीही ते घेत नाही, असे सांगत तक्रारदार सावन काळे यांनी संताप व्यक्त केला. महापालिका प्रशासन आणि आयुक्तांकडे वारंवार हेलपाटे मारूनही कोणतीही दखल घेतली जात नसल्याने अखेर येथील रहिवासी सावन काळे यांनी थेट मुख्यमंत्री पोर्टलवर महापालिका प्रशासनाविरोधात तक्रार दाखल केली होती. आता पुन्हा त्यांनी महापालिकेला पत्र दिले आहे.

### प्रशासनाच्या विरोधात आता न्यायालयीन लढा लढणार

पाणी मिळण्यासाठी काळे यांनी महापालिकेला ८ जून रोजी पत्र दिले आहे. याबाबत काळे म्हणाले, टँकरद्वारे वॉर्डात पाणी पुरवठा केले जातो. पण आमच्या सोसायटीला पाणी दिले जात नाही. राजकीय लोकांचे हस्तक हे टँकर भरुन लोकांना विकत आहेत. महापालिकेचे पाणी विकून काही लोकं गब्बर होत आहेत आणि आम्हाला पाण्यावाचून मारण्याची त्यांनी भूमिका घेतली आहे. महापालिकेचे आयुक्त डोळे झाकून बसले आहेत. हे टँकर कोठे जातात, याची तपासणी केली पाहिजे. पिण्याच्या पाण्यासाठी महापालिकेकडे वारंवार भीक मागावी लागत आहे. जी सेवा महापालिका देतच नाही, त्याचे देखील पैसे आमच्याकडून वसूल केले जातात. बोअरचे पाणी पिऊन आजार वाढू लागले आहेत. याला सर्वस्वी महापालिकेची यंत्रणा जबाबदार आहे. आमच्याकडून सर्व प्रकारचे कर घेतले जातात. मात्र, पाणी दिले जात नाही. मग आम्ही कर का भरावा? असा प्रश्नही काळे यांनी उपस्थित केला आहे. याविरोधात आता न्यायालयात दाद मागणार आहे, असा इशारा सावन काळे यांनी

# शिवसेना शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यावर श्रीरामपूरमध्ये 'भररस्त्यात गोळीबार'

## सुदैवाने हल्लेखोरांचा नेम चुकल्याने बालंबाल बचावले, पोलिसांकडून कसून तपास सुरु

श्रीरामपूर – श्रीरामपूर शहरातील गोंधवणी परिसरात शिवसेना (शिंदे गट) युवा विधानसभा संघटक प्रशांत कहाणे यांच्यावर अज्ञात हल्लेखोरांनी थेट गोळीबार केला आहे. मात्र हल्लेखोरांचा नेम चुकल्याने कहाणे हे बालंबाल बचावले आहेत. भररस्त्यात चालत्या गाडीवर झालेल्या या प्राणघातक हल्ल्यामुळे संपूर्ण श्रीरामपूर परिसर आणि राजकीय वर्तुळात प्रचंड खळबळ उडाली असून, शहरात सध्या तीव्र तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार,ही घटना ८ जून रोजी रात्री पावणेदहा वाजेच्या सुमारास घडली. शिवसेना नेते प्रशांत कहाणे हे त्यांच्या चारचाकी गाडीतून जात होते. त्याचवेळी गोंधवणी परिसरात दुचाकीवरून आलेल्या अज्ञात हल्लेखोरांनी त्यांच्या गाडीच्या दिशेने थेट गोळीबार केला. चालत्या गाडीवर अचानक गोळ्या झाडल्या गेल्याने परिसरात एकच घबराट पसरली. हल्लेखोरांनी प्रशांत कहाणे यांना संपवण्याच्या उद्देशानेच हा गोळीबार केला होता. मात्र, सुदैवाने हल्लेखोरांचा नेम चुकल्याने एक मोठी दुर्घटना टळली. प्रशांत कहाणे या जीवघेण्या हल्ल्यातून थोडक्यात आणि सुखरूप बचावले आहेत.

या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली.पोलिसांनी हल्लेखोरांचा कसून तपास सुरु केला आहे. हा हल्ला नेमका का करण्यात आला? या हल्ल्यामागे राजकीय वैमनस्य आहे की इतर काही वैयक्तिक कारण? याचा शोध पोलीस घेत आहेत.सध्या पोलीस परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासत असून, गोळीबार करून पळून गेलेल्या अज्ञात हल्लेखोरांसह त्यांच्या दुचाकीचा शोध युद्धपातळीवर सुरु आहे. या घटनेमुळे श्रीरामपूरकरांमध्ये भीतीचे वातावरण आहे.

### हल्लेखोरांचा शोध घेण्याचे मोठे आव्हान

विशेष म्हणजे शिवसेनेच्या नगरमधील पदाधिकाऱ्यांनी ८ जून रोजी दुपारीच राहुरी विद्यापीठाचे सुरक्षा रक्षक श्रीकांत दोंदे यांच्या हत्येप्रकरणी पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन यांची भेट घेत जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी गुंडांचे थेट एन्काऊंटर करण्याची मागणी निवेदनाद्वारे केली होती. त्याला काही तास उलटत नाही तोच त्यांच्याच पक्षाच्या पदाधिकाऱ्यावर गोळीबार झाल्याची घटना घडली आहे. राज्यातील सत्ताधारी पक्षातील पदाधिकाऱ्यांवर थेट गोळीबार झाल्याने या हल्लेखोरांचा शोध घेण्याचे मोठे आव्हान पोलिसांसमोर आहे.

कमर्शियल शॉप्स विकणे
लिंक रोड, डी.पी.रोड टच
भूषणनगर, केडगाव, अहिल्यानगर
Mo. 7448080326

परिमल मंगल पुजा कप साम्ब्राणी
आपल्या भक्ती मध्ये आणील शक्ती
Mangalpuja
प्रत्येक शुभ कार्यास शुध्द, सुवासिक असली साम्ब्राणी (लोबान) कप
तसेच भारतवासी, निळकंठ, केशर चंदन, इंडियन कस्तुरी शुभलाभ, कापुर, शेंदूर, अत्तर
अगरबत्ती चे जिल्हा वितरक
केवल अगरबत्ती
हॉटेल रसरंग समोर, आडते बाजार, अ.नगर.
वितरक नेमणे आहे

# नेप्ती कांदा मार्केटमध्ये शेतकऱ्यांना बेदम मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

नगर – नगर तालुका बाजार समितीच्या नेप्ती कांदा मार्केटमध्ये कांदे विक्रीसाठी गेलेल्या ३ शेतकऱ्यांना चौघांनी मोटारसायकलच्या चैनने बेदम मारहाण केल्याची घटना ८ जून रोजी सकाळी १०.३० च्या सुमारास घडली आहे.'आधी कांद्याचा लिलाव होऊ दे, त्यानंतर कांदे काढ', असे म्हणाल्याचा राग आल्याने हा हल्ला करण्यात आला. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात चौघांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत देविदास बाबासाहेब नागरे (वय ३५, रा. महदा, ता. आष्टी, जि. बीड) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी व त्यांचे चुलत भाऊ व नातेवाईक हे ८ जून कांदा लिलाव असल्याने त्यांच्या शेतात उत्पादित केलेले कांदे विक्री साठी नेप्ती मार्केट येथे घेवून आले होते. सकाळी १०.३० वाजताच्या सुमारास ते आपल्या कांद्याच्या गोण्यां जवळ बसले होते. त्यावेळी आरोपी गंगाधर रामा नागरे (रा. बारदरी, ता. नगर) हा तिथे आला आणि गोणीतून कांदे काढू लागला. फिर्यादी देविदास यांनी त्याला, आधी कांद्याचा लिलाव होऊ दे, त्यानंतर तू कांदे काढ असे सांगितले. या साध्या बोलण्याचा राग आल्याने गंगाधरने फिर्यादीला शिवीगाळ केली व तो तेथून निघून गेला. काही वेळानंतर आरोपी गंगाधर नागरे हा आपल्यासोबत इतर तीन अनोळखी इसमांना घेऊन परत आला. त्या तीन अनोळखी इसमांनी फिर्यादी देविदास यांना घट्ट पकडून ठेवले, तर आरोपी गंगाधरने त्याच्या जवळील मोटारसायकलची चैन काढून देविदास यांच्या डोक्यात मारली. या जबर हल्ल्यात देविदास गंभीर जखमी होऊन रक्तबंबाळ झाले. घटनेनंतर उपस्थित नातेवाईक सुरेश प्रल्हाद नागरे, म्हातरदेव दिनकर नागरे आणि नागनाथ सुखदेव आव्हाड यांनी जखमी देविदास यांना पिकअप गाडीतून तातडीने रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

फिर्यादीवर रुग्णालयात उपचार सुरू असतानाच, मार्केट यार्डात परत गेलेले त्यांचे चुलत भाऊ म्हातरदेव नागरे यांचा फोन आला. आरोपींनी त्यांनाही लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण करून शिवीगाळ केली. तसेच, तुमचे एकेकाचे तुकडे करून टाकीन, अशी जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी नगर तालुका पोलिसांनी आरोपी गंगाधर रामा नागरे व इतर तीन अनोळखी व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास स.पो.नि. गणेश वारुळे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला पो.हे.कॉ. रेपाळे या करत आहेत.

# जिल्ह्यात १७ जूनपर्यंत शस्त्र व जमावबंदी लागू

नगर – जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी अपर जिल्हा दंडाधिकारी दादासाहेब गिते यांनी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ च्या कलम ३७(१)(३) अन्वये १७ जून रोजी रात्री १२ वाजेपर्यंत संपूर्ण जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू केले आहेत.

धार्मिक कार्यक्रम, लग्नसमारंभ, मिरवणुका व प्रेतयात्रांतील जमावास या आदेशातून सूट देण्यात आली आहे. तसेच पोलीस अधिकारी, कर्तव्यावर असलेले शासकीय अधिकारी व कर्मचारी तसेच सभा अथवा मिरवणुकीसाठी विधिवत परवानगी घेतलेल्या व्यक्तींनाही या आदेशातून वगळण्यात आले आहे.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार असल्याचेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

अहिल्यानगरकरांचा अभूतपूर्व प्रतिसाद आणि
गेल्या १२ वर्षांपासून दिलेलेल्या विश्वासाबद्दल
मनःपूर्वक आभार!
या प्रेमाची आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव ठेवत, श्रीवारी आय फाउंडेशन (स्वस्तिक हॉस्पिटल्सचा एक उपक्रम) यांच्या प्रायोजकत्वाखाली स्वस्तिक आय इन्स्टिट्यूटतर्फे
दर महिन्याला पहिल्या ३० गरजू रुग्णांसाठी मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया
उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
ही सेवा समाजाप्रती असलेल्या आमच्या बांधिलकीचा एक भाग असून, गरजू रुग्णांना दर्जेदार नेत्रसेवा मिळावी हा यामागील उद्देश आहे.
सौ. निर्मला आणि श्री. जालंधर चौधरी यांच्या तर्फे
मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया
(दर महिन्याला पहिल्या ३० पात्र गरजू रुग्णांसाठी)
फक्त पूर्वनियोजित अपॉईंटमेंटद्वारे



स्वस्तिक आय इन्स्टिट्यूट
अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वात मोठे नेत्रालय
80014 80011
स्वस्तिक हॉस्पिटल, राजपाल क्लॉथ सेंटर समोर, इंदू पॅव्हेलियन कॉम्प्लेक्स आणि हॉटेल मेघनंदच्या मागे, कॉटेज कॉर्नर जवळ, अहिल्यानगर
SRIVARI
A unit of Swastik Hospitals
यांच्या सौजन्याने
• १२ वर्षांचा विश्वास
• सामाजिक बांधिलकी
• सेवेला समर्पित

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक के. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन-२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## कचरा उचलण्याच्या कारणावरून महिलांमध्ये हाणामारी; ३ जण जखमी; गुन्हा दाखल

नगर - शहरातील माळीवाडा भागातील बंगाल चौकी येथे कचरा उचलण्याच्या किरकोळ कारणावरून दोन गटांतील महिलांमध्ये जोरदार वाद झाला. या वादाचे पर्यावसान पुढे हाणामारीत झाले असून, प्लास्टिक पाईप, दगड आणि फरशीच्या तुकड्याने मारहाण करण्यात आली आहे. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात तीन महिलांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रामवाडी (सर्जेपुरा) येथील रहिवासी असलेल्या फिर्यादी इंदुबाई अशोक क्षीरसागर, त्यांची मुलगी आणि सून या ८ जून रोजी सकाळी ७ च्या सुमारास माळीवाडा येथील बंगाल चौकी परिसरात गेल्याहोत्या. तेथे कचरा उचलण्याच्या कारणावरून त्यांचा केडगाव येथील रहिवासी असलेल्या महिलांशी वाद झाला. हा वाद इतका वाढला की, आरोपी अलकाबाई बाजीराव उल्हारे, वनिता रामदास जगधने आणि कमल उल्हारे (सर्व रा. केडगाव) यांनी फिर्यादी व त्यांच्या नातेवाईक महिलांना शिवीगाळ करण्यास सुरवात केली.

त्यानंतर आरोपींनी चिडून जाऊन रस्त्यावरील दगड, फरशीचे तुकडे आणि प्लास्टिक पाईपच्या सहाय्याने फिर्यादी महिलांना बेदम मारहाण केली. तसेच जीवे मारण्याची धमकीही दिली.

या घटनेत फिर्यादी व त्यांच्या घरातील महिला जखमी झाल्या असून, त्यांना उपचारासाठी तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. रुग्णालयातून मिळालेल्या जबाबाच्या आधारे कोतवाली पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सहायक फौजदार संतोष बनकर या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत.

# टेम्पोला गाडी घासल्याच्या कारणावरून भिंगारमध्ये वाद

### एकास दगडाने मारहाण करत कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी

नगर - भिंगार येथील यशवंतनगर भागात टेम्पोला गाडीचा धक्का लागल्याच्या किरकोळ कारणावरून एका तरुणाला दगडाने मारहाण करून जखमी करत कुटुंबाला जीवे मारण्याची धमकी देण्याची घटना ७ जून रोजी सायंकाळी घडली आहे. याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत सुरेश किफावत काळे (वय ३५, रा. डेअरी फार्म, भिंगार) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादी हे यशवंतनगर येथील पालवे किराणा दुकानासमोरून जात होते. त्या वेळी रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका पिवळ्या रंगाच्या टेम्पोला सुरेश यांच्या गाडीचा किरकोळ धक्का लागला. याच कारणावरून आरोपी अशोक सकट याने चिडून हातात दगड घेतला आणि सुरेश यांच्या डोक्यात डाव्या बाजूला कानाच्या वर मारून त्यांना गंभीर जखमी केले.

हा वाद सोडवण्यासाठी गेलेल्या सुरेश यांच्या कुटुंबातील एका महिला नातेवाईकाला आरोपी योगेश अशोक सकट व आरमान यांनी लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच त्यांना रस्त्यावर जाहीररीत्या शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिली. मारहाणीनंतर जखमींना तातडीने उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या प्रकरणी सुरेश काळे यांनी कॅम्प पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी अशोक सकट, योगेश सकट आणि आरमान यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

## 'माळीवाडा पंचमंडळ देवस्थान'ने 'सभासद नोंदणी' माळी समाजासाठी खुली करावी : किशोर डागवाले

### सकल माळी समाज ट्रस्टची बैठक

नगर - प्रसाद कोके यांनी धर्मादाय आयुक्त कार्यालय येथे माळीवाडा पंच मंडळ देवस्थानने माळी समाजासाठी सभासद नोंदणी सुरू करावी. या मागणीसाठी उपोषण केले होते. यावेळी सकल माळी समाजाने मध्यस्थी केली होती. व प्रसाद कोके यांनी उपोषण थांबवले. श्री कोके यांची मागणी रास्त असल्याने सकल माळी समाजाने त्याचा मागणीचा पाठपुरावा करण्याचे ठरविले आहे.



माळीवाडा येथील महालक्ष्मी मंदिरात माळीवाडा पंच मंडळ ट्रस्ट श्री विशाल गणेश देवस्थानने सभासद नोंदणी माळी समाजासाठी खुली करावी, या मागणीसाठी सकल माळी समाज ट्रस्ट ची बैठक झाली.

शहराचे ग्रामदैवत श्री विशाल गणपती देवस्थान चे सभासदत्व मिळावे, अशी माळी समाज बांधव मागणी करीत आहे. धार्मिक कार्याची आवड असल्याने व श्रीगणेशा ची सेवा करण्याची संधी मिळावी. ही प्रत्येक समाजबांधवाची मनोभावे इच्छा आहे. माळीवाडा पंचमंडळ देवस्थानने सभासद नोंदणी माळी समाजासाठी खुली करावी, अशी मागणी सकल माळी समाज ट्रस्टच्या बैठकीत ठरले असल्याचे प्रतिपादन सकल माळी समाज ट्रस्टचे अध्यक्ष किशोर डागवाले यांनी केले आहे.

माळीवाडा येथील महालक्ष्मी मंदिरात माळीवाडा पंच मंडळ ट्रस्ट श्री विशाल गणेश देवस्थानने सभासद नोंदणी माळी समाजासाठी खुली करावी, या मागणीसाठी सकल माळी समाज ट्रस्ट ची बैठक झाली. या बैठकीत किशोर डागवाले, उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ, सचिव राजेंद्र पडोळे, विश्वस्त डॉ.रणजीत सत्रे, विनोद पुंड, कोअर कमिटी सदस्य अनिल इवळे, प्रकाश इवळे, अमोल भांबरकर, अखिल भारतीय समता परिषदेचे जिल्हाध्यक्ष ब्रिजेश ताठे, साहेबराव विधाते, नारायण इवळे, सुधाकर कानडे, विनायकराव कोके, राजेंद्र ताठे, प्रकाश इवळे, संजय कानडे, गणेश कोल्हे, प्रसाद कोके, जालिंदर खंदारे, मनोज भुजबळ, अशोक हजारे, रामदास खंदारे, सचिन एकाडे, संजय ताजणे, प्रकाश रासकर, भास्कर खंदारे, अर्जुन गोंधळे, अशोक हिंगे, कल्याणी गाडळकर, रेणुका पुंड आदी उपस्थित होते.

विनायकराव कोके म्हणाले, हा लढा मी वैयक्तिक स्वार्थासाठी उभारला नसून समाज हितासाठी सभासद नोंदणी सुरू करण्यात यावी अशी मागणी केलेली आहे. माळीवाडा पंच मंडळ देवस्थानने मला विश्वस्त करून माझ्या घरातील सभासद नोंदणी करण्याचे आमिष दिले होते. परंतु माळी समाज घटकांना समाविष्ट करावे. ही मागणी मी केलेली आहे.तसेच जे सभासद मयत झाले आहे. त्यांच्या वारसांना देखील सभासद करुन घ्यावे.

प्रकाश इवळे म्हणाले, कोके बंधूंनी माळीवाडा पंच मंडळ देवस्थानने सभासद नोंदणी सुरु करावी. या मागणीसाठी लढा उभारला आहे. या लढ्याला माळी समाजाने पाठिंबा द्यावा. कोके यांनी निस्वार्थपणे माळी समाजाचे बांधव व भगिनींसाठी सभासद नोंदणी करून घ्यावी, अशी मागणी केली आहे. ही मागणी रास्त असल्याने समाज त्यांच्यासोबत आहे. डॉ.रणजीत सत्रे म्हणाले, ग्रामदैवत श्री विशाल गणेश देवस्थाने सर्वांचे आराध्य दैवत आहेत. बालिकाश्रम रोड सुडके मळा, जाधव मळा, बोरुडे मळा, ताठे मळा या परिसरातील समाज बांधवांना माळीवाडा पंच मंडळ देवस्थानचे सभासद होण्याची संधी उपलब्ध करून द्यावी. व धार्मिक कार्यात सहभागी करून घ्यावे.

बाळासाहेब भुजबळ म्हणाले, कोके पाटील यांनी उभारलेला लढा हा वैयक्तिक नसून तो समाजासाठी असल्याने समाजाने सामूहिक निर्णय घेऊन त्यांना पाठिंबा दिला आहे. तसेच माळी समाजासाठी सभासद नोंदणी खुली करावी. या मागणीसाठी सकल माळी समाजाचे शिष्टमंडळ प्रयत्नशील असल्याचे सांगितले आहे.

यावेळी सचिन एकाडे, राजेंद्र पडोळे, अशोक हिंगे, राजेंद्र ताठे आदींनी मनोगत व्यक्त केले. यावेळी प्रसाद कोके यांनी आभार मानले.



जिल्हाधिकारी कार्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी डॉ. आशिया बोलत होते.

## जिल्हास्तरीय 'योग दिन कार्यक्रमा'चे सुयोग्य नियोजन करा : जिल्हाधिकारी

### 'योगा फॉर हेल्दी एजिंग' या संकल्पनेवर होणार जिल्हास्तरीय योग कार्यक्रम

नगर - आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त २१ जून रोजी आयोजित करण्यात येणाऱ्या जिल्हास्तरीय योग कार्यक्रमाचे सुयोग्य नियोजन करण्यात यावे. नागरिक, विद्यार्थी, अधिकारी, कर्मचारी, स्वयंसेवी संस्था तसेच विविध संघटनांच्या प्रतिनिधींनी योग दिन कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहून सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन कार्यक्रमाच्या नियोजनाबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी डॉ. आशिया बोलत होते.

बैठकीस शिक्षणाधिकारी (माध्यमिक) श्रीमती संध्या गायकवाड, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे तसेच विविध क्रीडा व योग संघटनांचे आणि क्रीडा भारतीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी डॉ. आशिया म्हणाले, यंदाच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची 'योगा फॉर हेल्दी एजिंग' ही संकल्पना अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. योगाभ्यासामुळे शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहण्यास मदत होते. नागरिकांमध्ये योगसाधनेविषयी जनजागृती निर्माण होऊन निरोगी जीवनशैलीचा संदेश व्यापक स्तरावर पोहोचणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

२१ जून रोजी सकाळी ६ ते ८ या वेळेत सावेडी येथील जॉगिंग ट्रॅकवर आयोजित सामूहिक योगाभ्यास कार्यक्रमासाठी येणाऱ्या नागरिकांसाठी बसण्याची व्यवस्था, पिण्याचे पाणी, स्वच्छता, वैद्यकीय सुविधा, वाहतूक नियंत्रण तसेच सुरक्षा व्यवस्थेचे प्रभावी नियोजन करण्यात यावे. कार्यक्रमस्थळी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, असे निर्देश त्यांनी दिले. कार्यक्रमाचे नियोजन वेळेत पूर्ण करावे तसेच नागरिकांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी व्यापक जनजागृती करावी, असे निर्देशही त्यांनी दिले.

# पैशाच्या वादातून दगडाने मारहाण करत एकाचा खून; तीन जणांना अटक

नगर - पैशाच्या वादातून तिघांनी केलेल्या बेदम मारहाणीत गंभीर जखमी झालेल्या साईनाथ भानुदास बर्डे (वय ५१) यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना ७ जून रोजी राहुरी तालुक्यातील सडे येथे घडली. या प्रकरणी पोलिसांनी तिघांना अटक केली आहे.

सडे येथील रहिवासी असलेले साईनाथ बर्डे हे ७ जून रोजी सायंकाळी सहा वाजता गावातील महादेव मंदिर परिसरात बसले होते. त्यावेळी पैशाच्या वादातून त्यांचा चुलत जावई, पुतण्या आणि त्यांचा एक मित्र यांनी साईनाथ बर्डे यांना लाकडी दांड्याने बेदम मारहाण केली. वडिलांना वाचविण्यासाठी त्यांचा मुलगा सुनिल बर्डे धावून गेला असता आरोपींनी त्यालाही दगड मारून जखमी केले. घटनेनंतर नातेवाईकांनी गंभीर जखमी साईनाथ बर्डे यांना वांबोरी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले. प्रकृती चिंताजनक असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी अहिल्यानगर येथील रुग्णालयात हलविण्यात आले. मात्र उपचार सुरू असताना रात्री १०.४५ वाजता त्यांचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक विजय देशमुख, पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघमारे, हवालदार अर्जुन दारकुंडे, प्रमोद ढाकणे, भाऊसाहेब शिरसाठ, सतीश कुन्हाडे आदींच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी रात्रभर शोधमोहीम राबवून आरोपी लक्ष्मण भाऊसाहेब माळी, सुनिल गंगाधर पवार आणि सागर सुभाष बर्डे यांना अटक केली आहे. या प्रकरणी मयत साईनाथ बर्डे यांचा मुलगा सुनिल साईनाथ बर्डे (वय २८. रा. सडे) यांनी राहुरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

### रोहित सुरतवाले यांचे अल्प आजाराने निधन



नगर - येथील रोहित प्रल्हाद सुरतवाले (वय ३४, रा.मच्छिंद्र कॉलनी, बुरुडगाव रोड) यांचे ८ जून रोजी अल्प आजाराने उपचारा दरम्यान पुणे येथे निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, भाऊ, पत्नी, २ मुले असा परिवार आहे. निखिल यांचे ते बंधू होत.

### मोहन चोभे यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर - बाबुर्डी बेंद येथील रहिवासी मोहन चंद्रभान चोभे (वय ७५) यांचे ९ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बाबुर्डी बेंद येथील स्म शानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, २ मुली, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. अरविंद व जनार्दन चोभे यांचे ते वडील होत.

### मालतीबाई आहेर यांचे अल्प आजाराने निधन



कोपरगाव - येथील गं.भा. मालतीबाई माधवराव आहेर (रा.समतानगर) यांचे ७ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर समतानगर कोपरगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, दीर, नातवंडे असा परिवार आहे.

### गंगाधर चोथे यांचे हृदयविकाराने निधन



नगर - तालुक्यातील इसळक येथील वारकरी संप्रदायाचे पाईक गंगाधर तुकाराम चोथे (वय ७५) यांचे नुकतेच हृदयविकाराने निधन झाले. ते अत्यंत धार्मिक स्वभावाचे होते. आदिक मासानिमित्त ते बीड जिल्ह्यातील पुरूषोत्तमपुरी येथे देवदर्शनासाठी गेले होते. परतीच्या प्रवासात त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका बसला आणि त्या त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या मागे पाच मुली, नातवंडे असा परिवार आहे. उद्योजक दीपक वाडेकर, भाऊसाहेब वाडेकर, आगडगाव येथील काळभैरवनाथ देवस्थानचे व्यवस्थापक नामदेव कराळे, शेतकरी उत्तम ससे यांचे ते सासरे होत.

## मार्केटयार्ड परिसरात वृद्ध महिलेची फसवणूक करणारा जेरबंद

नगर - मार्केटयार्ड परिसरात हमाल पंचायत जवळ एका वृध्द महिलेची फसवणूक करून त्यांच्या गळ्यातील व कानातील सोन्याचे दागिने लंपास करणाऱ्या चोरट्याला कोतवाली पोलिसांनी अटक केली असून त्याच्याकडून चोरीस गेलेला सोन्याचा मुद्देमालही हस्तगत करण्यात आला आहे. ज्ञानदेव हरीभाऊ चेडे (रा. पारनेर, सध्या रा. सारसनगर, अहिल्यानगर) असे त्याचे नाव आहे.

द्रौपदाबाई धोंडीराम घोलप (वय ७०, रा. भातोडी पारगाव, ता.नगर) यांना ५ जून रोजी मार्केट यार्ड परिसरात रिक्षाची वाट पाहत उभ्या असताना आरोपीने त्यांच्याजवळ जात गोड बोलून त्यांचा विश्वास संपादन केला. तुमचे डोलाचे पैसे आले आहेत तसेच तुमच्या मुलाने तुम्हाला बोलावले आहे, असे सांगत त्याने दुचाकीवर बसवून हमाल पंचायत कार्यालयासमोर नेले. तेथे तुम्हाला पैसे मिळवून देण्यासाठी गळ्यातील पानपोत आणि कानातील सोन्याची फुले द्यावी लागतील, असे सांगून आरोपीने महिलेकडील सोन्याचे दागिने काढून घेतले आणि तेथून पसार झाला.




मार्केटयार्ड परिसरात वृद्ध महिलेची फसवणूक करणाऱ्या आरोपीला मुद्देमालासह पकडल्यानंतर त्याच्या समवेत कोतवाली पोलिसांचे पथक.

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांनी गुन्हे शोध पथकाला आरोपीचा शोध घेण्याचे आदेश दिले. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील व त्यांच्या पथकाने मार्केट यार्ड परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची तपासणी केली. तसेच तांत्रिक विश्लेषणाच्या मदतीने आरोपीचा माग काढण्यात आला. तपासादरम्यान संशयित ज्ञानदेव हरीभाऊ चेडे (रा. पारनेर, सध्या रा. सारसनगर, अहिल्यानगर) याची ओळख पटली. पोलिसांनी त्याला गुन्ह्यात वापरलेल्या दुचाकीसह ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्याने गुन्ह्याची कबुली दिली. त्यानंतर त्याला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून फसवणुकीने घेऊन गेलेले सोन्याचे दागिने जप्त करण्यात आले आहेत.

ही कारवाई पोलीस निरीक्षक संभाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाटील, पोलीस अंमलदार विक्रम वाघमारे, सुर्यकांत डाके, बाळकृष्ण दौंड, राहुल शिंदे, साबीर शेख, विशाल दळवी, विनोद बोरगे, दीपक रोहकले, सत्यम शिंदे, सुरज कदम, शिरीष तरटे, अतुल कोतकर, रमेश शिंदे, अमोल गाडे, अतुल काजळे, अतुल लाटे, सचिन लोळगे, संकेत धिवर, दक्षिण मोबाईल सेलचे राहुल गुंडू, महिला पो.हे.कॉ. रोहिणी दरंदले, महिला पो. कॉ. पल्लवी रोहकले यांच्या पथकाने केली.

## सीना नदी संवर्धनासाठी युद्धपातळीवर कामे राबविणार

### अतिक्रमित वीटभट्ट्यांवरही कारवाई होणार : पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील

नगर - सीना नदी हा अहिल्यानगर शहराचा मानबिंदू असून नदी संवर्धन, अतिक्रमण निर्मूलन आणि नदीपात्र रुंदीकरणासाठी व्यापक स्तरावर कामे हाती घेण्यात येणार आहेत. अतिक्रमण करणाऱ्या वीटभट्ट्यांसह कोणीही असले तरी त्यांच्यावर कारवाई केली जाईल. तसेच, नदीचे नैसर्गिक स्वरूप जपून नागरिकांसाठी चांगल्या सार्वजनिक जागा विकसित केल्या जातील, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

शहरातील सीना नदीच्या हद्द निश्चितीच्या कामाची पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी आज प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जलसंपदा विभागाच्या अधीक्षक अभियंता अलका अहिरराव यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी सीना नदी हद्द निश्चिती, अतिक्रमण हटविणे, रुंदीकरण तसेच संवर्धनासाठी प्रस्तावित कामांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली.



सीना नदीमध्ये सुरु असलेले कामाची पाहणी पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केली. (छाया - लहू दळवी)

पालकमंत्री डॉ. विखे पाटील म्हणाले, गेल्या काही वर्षांत नदीच्या भोवताली मोठ्या प्रमाणावर अतिक्रमणे झाल्याने नदीचे पात्र शिल्लक राहिलेले नाही. आमदार संग्राम जगताप यांनी यासाठी विशेष पुढाकार घेतला असून, पहिल्या टप्प्यात ३ किलोमीटरपर्यंतचे रुंदीकरण व अतिक्रमण काढण्यासाठी २० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला होता. आता नव्याने महापालिकेला आपत्ती व्यवस्थापनातून आणि जलसंपदा खात्याकडून निधी उपलब्ध करून हे काम पूर्ण केले जाईल. तसेच, जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून संपूर्ण १४-१५ किलोमीटर नदीपात्रातील अतिक्रमणे हटवून रुंदीकरणाचे काम जलसंपदा विभागाच्या माध्यमातून युद्धपातळीवर केले जाणार आहे.

शहरातील अनेक नाल्यांचे प्रवाह अतिक्रमणामुळे थांबले असून याचा थेट परिणाम शहराच्या आरोग्य व्यवस्थेवर झाला आहे. यासंदर्भात मुख्यमंत्र्यांसोबतही चर्चा झाली आहे. हे नाले प्रवाही व अतिक्रमणमुक्त करण्यासाठी महापालिकेला सोबत घेऊन जिल्हाधिकाऱ्यांच्या स्तरावर पुन्हा नव्याने सर्वेक्षण केले जाईल.

महानगरपालिकेचे सांडपाणी १०० टक्के प्रक्रिया करूनच नदीमध्ये सोडले गेले पाहिजे. अन्यथा नदी स्वच्छ करूनही उपयोग होणार नाही. यासाठी सध्याच्या सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाची क्षमता कमी असल्यास, महापालिकेला आवश्यक त्या सुविधा आणि वाढीव प्रकल्पासाठी स्वतः तरतूद करू, अशी ग्वाहीदेखील पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांनी यावेळी दिली.

# सरधोपट अभ्यासक्रम न निवडता वेगळ्या पर्यायांचा विचार करावा

**पुरातत्वशास्त्र अभ्यासिका गिरिजा दुधाट यांचे आवाहन; ब्राह्मण बिझनेस वेलफेअर नेटवर्क असोसिएशनच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान**



नगरच्या ब्राह्मण बिझनेस वेलफेअर नेटवर्क असोसिएशनच्या वतीने आयोजित करियर मार्गदर्शन कार्यक्रमात दहावी बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान पुरातत्वशास्त्र अभ्यासिका गिरिजा दुधाट यांच्या हस्त करण्यात आला.

नगर – दहावीनंतरच काय आवडतं आणि काय करायचंय याचा गांभीर्याने पालक आणि विद्यार्थी यांनी विचार करणे अत्यावश्यक आहे. करियरसाठी पुरातत्वशास्त्र हा उत्तम पर्याय व वेगळा पर्याय आहे. मी स्वत: पुरातत्व विज्ञान या शाखेकडे जायचे ठरवले असताना माझ्या कुटुंबातील प्रत्येकाने पाठिंबा दिला. या क्षेत्राचा मोठा आवाका बघून इतिहास आणि पुरातत्वशास्त्र याची सांगड घालून १२ वे ते १८ वे शतक यामधील भारतीय शस्त्रांचा अभ्यास सुरू केला. हे क्षेत्र पूर्णतः नवीन आणि अनभिज्ञ असल्यामुळे स्वतःचे वेगळेपण सिद्ध करायला पूर्णतः वाव मिळला. दहावी–बारावीच्या विद्यार्थ्यांनी करियर निवडताना सरधोपट अभ्यासक्रम न निवडता वेगळ्या पर्यायांचा विचार नक्कीच करावा, असे आवाहन आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या पुरातत्वशास्त्र अभ्यासिका, संशोधिका व लेखिका गिरिजा दुधाट यांनी केले.

अहिल्यानगर ब्राह्मण बिझनेस वेलफेअर नेटवर्क असोसिएशन (बी.बी.एन.) आयोजित ब्राह्मण समाजातील दहावी बारावी उत्तीर्ण गुणवंत विद्यार्थ्यांसाठी आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना गिरिजा दुधाट बोलत होत्या. यावेळी व्यासपीठावर विक्रीकर अधिकारी श्रीनिवास श्रोत्री, इंग्रजी विषयाचे प्राध्यापक आशीष तट्टू, संस्थेचे विश्वस्त निखिल कुलकर्णी, कोर कमिटीच्या अध्यक्षा शिल्पा सोमणी आदी उपस्थित होते. या कार्यक्रमात उपस्थितीत सर्व गुणवंत विधार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमात अमित काळे यांनी घेतलेल्या मुलाखतीतून गिरिजा दुधाट यांची पुरातत्वशास्त्राचे महत्व सांगितले. त्या म्हणाल्या, करियर साठी पुरातत्वशास्त्र हा वेगळा विषय निवडण्यासाठी आपल्या मधील कौशल्ये विकसित करावे लागतात. पुरातत्व शास्त्राचा आवाका फार मोठा असून या विषयासोबत इतिहास, भूगोल, भूगर्भशास्त्राचा देखील मोठा अभ्यास करावा लागतो. इतिहास हा विषय मानवलिखित आणि कालमापनानुसार घडलेल्या घटनांचा अभ्यास असतो, तर पुरातत्वशास्त्रात काही हजार वर्षांपूर्वीच्या घटना, विविध स्थित्यंतरं आणि मानवी उत्क्रांती, विविध संस्कृती याचा सखोल अभ्यास होतो. अनेक भाषा,संदर्भ, जगभरात झालेले काम या सगळ्याचा ताळमेळ लावावा लागतो. कालानुरूप ए आय चा वापर आपणास करणे, अत्यावश्यक आहे. वाचनाबरोबरच सूक्ष्मपणे अभ्यास करणे या क्षेत्रात काम करणाऱ्यांसाठी अति महत्त्वाचे आहे.

यावेळी महाराष्ट्र राज्य आयोग परीक्षेट उत्तीर्ण होऊन विक्रीकर अधिकारी म्हणून नियुक्त झालेले श्रीनिवास श्रोत्री यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी आपल्या संवादातून उत्तम करियरसाठी गांभीर्याने अभ्यास करण्यास कोणताही दुसरा पर्याय नाही, हे सांगितले.

आशिष तट्टू यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सतत अभ्यास न करता मध्ये ब्रेक घेतल्यास अभ्यास अजून चांगल्या पद्धतीने करता येतो. त्यासाठी एखादा छंद किंवा आवड जरूर जोपासावी, असा संदेश दिला. यावेळी ज्येष्ठ पत्रकार आणि इतिहासाचे गाढे अभ्यासक स्वर्गीय भूषण देशमुख यांना आदरांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमाचे स्वागत शैलेश राजगुरू यांनी केले तर प्रास्ताविक असावरी नातू यांनी केले. उमेश भालेराव आणि अपूर्वा काळे यांनी प्रमुख पाहुणे आणि अतिथी यांचा परिचय करून दिला. शिल्पा सोमणी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मिलिंद कुलकर्णी, स्नेहल धर्माधिकारी, श्रीपाद पुणतांबेकर, अमित परंडकर, हेमंत लोहगावकर, निखिल कुलकर्णी, वर्षा जोशी आदींनी परिश्रम घेतले.

यावेळी गिरीजा दुधाट यांनी भारतीयांमध्ये ऐतिहासिक वास्तुंबाबत मोठी उदासीनता असून आपले अनेक शस्त्रे आणि माहिती परदेशातील संग्रहालयात उत्तमरित्या संवर्धन केले गेले आहेत. त्यामानाने भारतामध्ये तशी व्यवस्था अद्याप नाही, या गोष्टीचे वैषम्य वाटत असल्याचे सांगून खंत व्यक्त केली. भारतीय शस्त्रं, आयुधं आणि त्या अनुषंगाने संस्कृतीचा व इतिहासाचे संवर्धन होणे ही सर्व भारतीयांची जबाबदारी आहे. परदेशी संग्रहालयांना दरवर्षी लाखो पर्यटक भेट देतात. आपल्याकडे जर उत्तम व्यवस्था असती तर अनेक परदेशी पर्यटक भारतामध्ये येऊन येथे अभ्यास करू शकले असते. त्याद्वारे भारताट पर्यटनाला चालना मिळून देशाची अर्थव्यवस्था मजबूत होण्यासाठी हे संवर्धन आवश्यक असल्याचे त्यांनी मुलाखतीतून नमूद केले.

# प्रेरणादायी अक्षरधन

## अंतरिचा ज्ञानदिवा

“मुसाफिर”
संकलन: दिशान फिचर्स




सभोवार अंधार, मला त्याचे भय फार. वाटते, लावावे दिवे चार. व्हावा संचार. भय जावे पार. आनंद सुटावा अपरंपार.

नको नको हा अंधार. व्हावा पटकन उष:काल. अंधाराचा कर्दनकाळ. सुटले मग अंधाराच्या बंधनातून. भयभीतीच्या जाचापासून. पसरला प्रकाश, उजळले आकाश. लोकांच्या निराशेचा नाश. तुटले पापांचे पाश. ते मालिन्य झाले हताश. उषेने पसरविले सर्वत्र मधुर हास्य. संपले तिमिरामुळे आलेले दुःखाचे दास्य. उषेने आम्हाला जागवले; कर्तव्याला प्रेरित केले..

पण उष:काल होईपर्यंत काय? अंधाराचेच धरायचे पाय? अंधाराच्या ठोकरा खात म्हणायचे, 'हाय ?' मनाचे भय कशाने जाय ?

दिव्याचे मोठेपण काय सांगावे ? प्रकाश उजळतो. अंधार पळतो; पण हा दिवा आहे भक्तीचा. आधार एकमेव जिवाचा. ज्ञान हा रवा प्रकाशाचा, पसरावर सर्वदूर.

अरे माणसा, संतांनाही अंधाराचे भय वाटते; पण हा अंधार सभोवारचा नाही. हा अंधार अज्ञानाचा आहे. स्वतःचे सामर्थ्य न ओळखण्याचा आहे. मीच स्वत: दिवा आहे. माझाच प्रकाश मोलाचा आहे. मी तो विसरलो आहे. उगाच निराश व हताश झालो आहे. हृदयात चैतन्य आहे. ते लख्ख प्रकाशमान आहे. त्या प्रकाशाकडे का दुर्लक्ष आहे?

एक होता देवदत्त. त्याने केली चोरी. लुटली धनदौलत भारी. मग रोज देवळात जाई. असंख्य दिवे लावी. पाऊस, वारा, थंडी, ऊन नव्हे, गारांचा मारा; हे सगळे असले तरी तो रोज जाई देवळात. तिथे दिवे लावून करी सोहळा. कोपऱ्यात बसलेला असे एक साधू. तो हसे देवदत्ताला. एकदा देवदत्त म्हणाला, काय हो साधुबुवा, तुम्हाला का हसू येते? मी एवढे दिवे लावतो न चुकता देवाजवळ. प्रकाश पडतो सर्वत्र, कसे छान वाटते?

साधू गप्पच देवदत्त बोलतच होता, अहो साधुबुवा, माझ्यावर चोरीचा आरोप होता. देवाने मला वाचवले. चोरीच्या धनामुळे मी श्रीमंत झालो. व्यापार करू लागलो. त्यातही चोरी–लबाडी करून आणखी संपत्ती मिळवली. तिथेही देवाने माझी लाज राखली. एका फसवाफसवीच्या गुन्ह्यातून मुक्तता झाली.

आता मात्र साधू बोलला, एवढा बाहेर प्रकाश केलास; पण मनात का भ्यालास?

कुठे भ्यालो ?

खोटं का बोलतोस? तुझ्या खिशातले पिस्तूल काय सांगते? परवा कुणीतरी देवळात शिरला तेव्हा तू गाभाऱ्यात लपलास ?

अहो साधुबुवा, माझी चोरी, खोटा व्यापार, त्यामुळे मला शत्रू फार. मनात भीती अपरंपार म्हणजेच बाहेर प्रकाश; पण मनात अंधार. काय उपयोग मग या बाहेरच्या तू लावतोस त्या दिव्यांचा ?

ज्याच्या मनात प्रकाश, त्याच्या मुठीत आकाश !

**– किशोर गांधी**

# बीएसएफ पोलीस निरीक्षकपदी सुजित सिरामे यांची निवड



नगर – येथील गोदावरी ॲकॅडमीचा विद्यार्थी सुजित सिरामे यांची सीमा सुरक्षा दलमध्ये पोलीस निरीक्षक पदावर निवड झाली असून प्रशिक्षणासाठी जोधपूर येथे रवाना झाले आहेत. अथक परिश्रम, जिद्द आणि योग्य मार्गदर्शना मुळे हे यश मिळाले त्यांना येथील गोदावरी अक्ॅडेमीचे अध्यक्ष बाजीराव खांदवे यांचे मार्गदर्शन लाभले. सुजीत सिरामे यांचे वडील दिगंबर सिरामे, आई अरुणा, आजोबा रामदास सिरामे, आजी सौ. इंदुबाई सिरामे, बहीण सौ. प्राजक्ता व मेहुणे दीपक नथू सनसे यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

सुजीत सिरामे यांचे प्रशिक्षण जोधपूर येथे सुरू असून प्रशिक्षण कालावधी एक वर्षाचा आहे.

# 'पुस्तकांचे गाव' उपक्रमासाठी ३० जूनपर्यंत प्रस्ताव पाठवावेत : जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया

नगर – वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी तसेच ग्रामीण भागात ज्ञानाचा प्रसार अधिक व्यापक करण्याच्या उद्देशाने राज्य मराठी विकास संस्थेमार्फत राबविण्यात येणाऱ्या 'पुस्तकांचे गाव' या महत्त्वाकांक्षी उपक्रमासाठी जिल्ह्यातून एका गावाची निवड करण्यात येणार असून इच्छुक ग्रामपंचायती, संस्था व स्थानिक स्वराज्य संस्थांनी ३० जून पर्यंत प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा मराठी भाषा समितीचे अध्यक्ष डॉ. पंकज आशिया यांनी केले आहे.

राज्यात पुस्तकांचे गाव निर्माण करताना सहभागी होऊ इच्छिणाऱ्या मंडळांनी, देवस्थानांनी, ग्रामपंचायतींनी, संस्थांनी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी कोणत्याही आर्थिक लाभाची अपेक्षा न ठेवता या उपक्रमात सहभागी व्हावे. या उपक्रमात व्यापक लोकसहभाग असणे आवश्यक असून त्याबाबतचा उल्लेख स्थानिक स्वराज्य संस्थेच्या ठरावामध्ये असणे बंधनकारक आहे. प्रत्येक ग्रंथदालनाचे क्षेत्रफळ किमान १५० चौ. फूट असावे तसेच संबंधित जागा विनामूल्य उपलब्ध करून देणे आवश्यक राहील. यासाठी किमान पाच वर्षांचा करार करणे बंधनकारक राहणार आहे. गावातील परिस्थितीनुसार उपलब्ध दालनांची संख्या व आकारमान कमी–जास्त असू शकते. त्याबाबतचा अंतिम निर्णय राज्य मराठी विकास संस्था घेणार आहे.

'पुस्तकांचे गाव' निवडीसाठी शासनाने काही निकष निश्चित केले आहेत. त्यानुसार ही योजना फक्त ग्रामपंचायत, नगरपंचायत व 'क' वर्ग नगरपरिषद क्षेत्रात राबविण्यात येणार आहे. संबंधित ग्रामपंचायत, नगरपंचायत अथवा नगरपरिषदेचा ठराव आवश्यक राहील. शासनाने घोषित केलेली पर्यटनस्थळे, तीर्थक्षेत्रे, ऐतिहासिक वारसा असलेली गावे, राज्य किंवा केंद्र संरक्षित स्मारके असलेली गावे तसेच संत गाडगेबाबा, आदर्श गाव, तंटामुक्ती, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आदी राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त गावांना प्राधान्य दिले जाणार आहे. तसेच साहित्यिक किंवा वाङ्मयीन चळवळीची परंपरा असलेल्या गावांचाही विचार केला जाणार आहे.

प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जिल्हा मराठी भाषा समितीकडून प्रत्यक्ष पाहणी करून पात्रतेचा अहवाल सादर करण्यात येईल व त्यानंतर गावाची अंतिम निवड करण्यात येईल. निवड झालेल्या गावात सुरुवातीला किमान दहा ग्रंथदालने सुरू करण्यात येतील. या दालनांसाठी आवश्यक आवर्ती व अनावर्ती खर्च शासनाकडून करण्यात येणार आहे. उपलब्ध जागा, वाचन संस्कृतीची परंपरा आणि पर्यटन विकासाची क्षमता या बाबींचा विचार करून गावाची निवड केली जाईल. केवळ पुस्तक विक्री किंवा प्रदर्शनापुरता हा उपक्रम मर्यादित न राहता वाचन प्रेरणा, साहित्यिक उपक्रम, ग्रंथदालने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून ज्ञानकेंद्र उभारून मराठी साहित्यविश्वाचे दर्शन घडविणे आणि पर्यटन विकासाला चालना देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

अधिक माहिती, अटी व शर्तींसाठी मराठी भाषा विभागाचा ३० जानेवारी २०२६ रोजीचा शासन निर्णय पाहावा. इच्छुक मंडळांनी, देवस्थानांनी, ग्रामपंचायतींनी, संस्थांनी तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांनी आवश्यक कागदपत्रांसह परिपूर्ण प्रस्ताव ३० जूनपर्यंत संचालक, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई यांच्या नावे जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, त्रिवेणी कोर्ट कॉलनी, पंपिंग स्टेशन रोड, महालक्ष्मी उद्यानाजवळ, भुतकरवाडी, सावेडी, अहिल्यानगर येथे तीन प्रतींमध्ये सादर करावेत.

या उपक्रमासाठी जिल्हा ग्रंथालय अधिकारी, अहिल्यानगर यांची समन्वय अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली असून अधिक माहितीसाठी ९४०४८०१६९४ किंवा ८३२९२९५२३६ या क्रमांकांवर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



इ. १० वी, १२ वीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आणि गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सुनंदाताई सदाशिव अमरापूरकर आदी.

# सुप्त मनाची प्रचंड ताकद ओळखा

## सुनंदा अमरापूरकर यांचे प्रतिपादन

भिंगार – मानवी जीवनात सातत्य अत्यंत महत्त्वाचे आहे. शिकायला वयाचे बंधन नसते. शरीरात मनाचं स्थान नक्की कोठे आहे हे सांगता येत नाही. सुप्त मनाची ताकद प्रचंड आहे, ती ओळखा. सुप्त मनाला विचारत रहा. मुला–मुलींनी मोबाईलचा जपून वापर करा. मला कशाची आवड आहे हे महत्त्वाचे असून काय आवश्यक आहे? हे विचारत रहावं. अवांतर वाचन आपल्याला समृद्ध करतं. सावित्रीबाईंनी चिखलाचा मारा सहन केला पण मुलींना शिकवलं नाही तर आजही महिला स्वयंपाक घरातच असत्या. सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर ह्यांचं सामाजिक कार्यातलं योगदान समाजाच्या प्रगतीसाठी महत्वाचं आहे. सावित्रीबाई फुले सेवाभावी संस्था सातत्याने २५ वर्षे सामाजिक उपक्रमांसाठी कार्यरत आहे हे निश्चितच कौतुकास्पद, अनुकरणीय आहे. सदस्य तळमळीने कार्य करत आहेत, सेवाभाव जपत सातत्याने २५ वर्षे कार्यरत राहणं अवघड गोष्ट आहे, असे सुनंदाताई अमरापूरकर म्हणाल्या.

विशाल लाहोटी म्हणाले की गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक सावित्रीबाई फुले सेवाभावी संस्था वर्षानुवर्ष करत आहे. आपण रिकाम्या हाताने आलो आहोत, जन्म ते मृत्यूपर्यंत प्रवास किती हे निश्चित वेळ माहीत नसते म्हणून वेळेचा सदुपयोग करा. वेळेच्या बाबतीत सजग रहा, वेळ परत परत मिळत नाही.

'समाजसेवा हिच खरी ईश्वरसेवा' हे ब्रीद घेऊन २६ व्या वर्षी इ. १० वी, १२ वीच्या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान आणि गरजू विद्यार्थ्यांना वह्यांचे मोफत वाटप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून सुनंदाताई सदाशिव अमरापूरकर, लेखिका–निवेदिका दिपाली माळी, ट्रेकर, क्लिनिकल मानसशास्त्रज्ञ, पर्यावरण प्रेमी, स्तंभलेखक विशाल लाहोटी, नाट्य, मालिका, चित्रपट अभिनेते मोहिनीराज गटणे, आर जे अनु उपस्थित होते.

दिपाली माळी म्हणाल्या की सातत्याने करणं महत्त्वाचं आहे. विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवलेच पाहिजे. सोशल मीडिया वापरून नवीन जगाशी कनेक्ट व्हा पण वेळ मात्र ठरवून घ्या.

मोहिनीराज गटणे म्हणाले की मुलांना जे मनापासून करावं वाटतं ते नक्कीच करा. ह्याप्रसंगी ८७ वेळा रक्तदान करणारे श्रीकांत वराडे, रक्तदाता राजेश तनपुरे, आरजे अनु, साहित्यिक सुरेखा घोलप–भुकन, नाट्य, मालिका, चित्रपट अभिनेत्री विद्या जोशी, कॅन्टोन्मेंट शाळेतील शिक्षिका स्नेहल लवांडे, अलकाताई अमरापूरकर ह्यांचा सन्मान करण्यात आला. सुत्रसंचलन नाट, लघुचित्रपट लेखक, अभिनेते सुनील राऊत यांनी केले.

याप्रसंगी भिंगार माळी समाजाचे विश्वस्त राजेंद्र झोडगे, सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र पांढरे, अभय पांढरे, वैभव पांढरे, लखन टेके, सदानंद राऊत, राजेंद्र विधाटे, राजेश नागपुरे, प्रवीण साळुंके, रोहिदास हराळे, निलेश रासकर, सीमा मेहर, राखी सातव, सौ. प्रणिता शिंदे, सौ. संगिता राऊत, सौ.अपर्णा पांढरे, राखी लकारे, किशोर फुलारी, अजय राऊत, दीपक गोंधळेंसह गुणवंत विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

# बँक ऑफ महाराष्ट्रच्या वाकोडी फाटा शाखेविरोधात 'रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या लोकपालांकडे' तक्रार

## विविध बाबींच्या चौकशीची मागणी



नगर – बँक ऑफ महाराष्ट्रच्या वाकोडी फाटा शाखेच्या कामकाजाबाबत काही आक्षेप नोंदवत ग्राहक गणेश इंगळे यांनी भारतीय रिझर्व्ह बँकेच्या (आरबीआय) एकात्मिक लोकपाल योजनेअंतर्गत तक्रार दाखल केली असून, मृत खातेदाराच्या दाव्याच्या निपटाऱ्यात झालेला कथित विलंब, माहिती उपलब्ध करून देण्याबाबतची भूमिका तसेच खाते उघडण्याच्या प्रक्रियेदरम्यान कथित शुल्क आकारणीच्या आरोपांची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

तक्रारदार गणेश इंगळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, मृत खातेदाराच्या वारसदाराच्या नात्याने आवश्यक कागदपत्रे एप्रिल २०२६ मध्ये शाखेत सादर करण्यात आली होती. संबंधित कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झाल्यानंतर दावा निकाली निघण्याबाबत शाखेकडून सकारात्मक माहिती देण्यात आल्याचे तक्रारदाराचे म्हणणे आहे. तथापि, उर्वरित प्रक्रिया पूर्ण होण्यास अपेक्षेपेक्षा अधिक कालावधी लागल्याचा दावा त्यांनी केला आहे.

तक्रारदाराच्या म्हणण्यानुसार, विलंबाबाबत स्पष्ट लेखी माहिती मिळाली नसल्याने त्यांनी वारंवार शाखेशी संपर्क साधला. त्यानंतर त्यांनी आरबीआयच्या तक्रार निवारण पोर्टलवर तक्रार दाखल केली. तक्रारीवरील बँकेच्या उत्तरामध्ये ग्राहक पुढील प्रक्रियेसाठी शाखेत आला नाही असे नमूद करण्यात आल्याचे तक्रारदाराने सांगितले असून, संबंधित कारणाबाबतही स्वतंत्र चौकशी व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

याशिवाय, शाखेशी संलग्न असलेल्या बिझनेस करस्पाँडंट (बीसी) मार्फत खाते उघडण्याच्या प्रक्रियेत काही ग्राहकांकडून रक्कम घेतली जात असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याचा दावा तक्रारदाराने केला आहे. या बाबींची सत्यता पडताळून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी संबंधित यंत्रणेकडे केली आहे.

तक्रारदाराने असेही म्हटले आहे की, त्यांनी मागविलेल्या काही कागदपत्रांपैकी मर्यादित माहिती उपलब्ध करून देण्यात आली असून, इतर काही कागदपत्रे व नोंदी अद्याप उपलब्ध झालेल्या नाहीत. त्यामुळे संबंधित प्रकरणातील सर्व नोंदींची तपासणी करून आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, मृत खातेदारांच्या दाव्यांच्या निपटाऱ्याची प्रक्रिया, ग्राहक सेवा, माहिती उपलब्ध करून देण्याची पद्धत तसेच खाते उघडण्याच्या प्रक्रियेशी संबंधित तक्रारींची निष्पक्ष चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी, अशी मागणी तक्रारदाराने आरबीआय लोकपालांकडे केली आहे.

# श्री स्वामी समर्थ मंदिर व बालसंस्कार केंद्राच्या सुशोभीकरण कामाचा लोकार्पण सोहळा उत्साहात

नगर – संत–महंतांच्या पदस्पर्शाने पावन झालेली महाराष्ट्राची भूमी ही अध्यात्म, संस्कार आणि समाजप्रबोधनाची भूमी म्हणून ओळखली जाते. संतांचे विचार, त्यांचे कार्य आणि त्यांनी दिलेले जीवनमूल्यांचे संदेश धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजापर्यंत पोहोचत असतात. अशाच अध्यात्मिक वातावरणाने नटलेल्या सारसनगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिर व बालसंस्कार केंद्र परिसराच्या सुशोभीकरण कामाचा लोकार्पण सोहळा उत्साहात झाला.

नगरसेविका मीनाताई संजय चोपडा यांच्या सातत्यपूर्ण प्रयत्नातून तसेच आमदार संग्राम जगताप यांच्या स्थानिक विकास निधीतून मंदिर परिसराचे सुशोभीकरण करण्यात आले असून या कामामुळे परिसराचे सौंदर्य अधिक खुलून आले आहे. मंदिर परिसर आता केवळ धार्मिक स्थळ न राहता अध्यात्म, संस्कार आणि सामाजिक बांधिलकीचे प्रेरणास्थान बनला आहे.

लोकार्पण सोहळ्याप्रसंगी बोलताना माजी उपमहापौर गणेश भोसले म्हणाले की, आपली संस्कृती ही जगातील सर्वात समृद्ध संस्कृती आहे. संतांचे विचार समाजाला दिशा देणारे आणि माणुसकीची शिकवण देणारे आहेत. श्री स्वामी समर्थ मंदिर हे केवळ पूजेचे ठिकाण नसून अध्यात्मिकतेचे, संस्कारांचे आणि सामाजिक ऐक्याचे केंद्र बनले आहे. येथे वर्षभर विविध धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात पार पडत असतात. त्यामुळे समाजात सकारात्मक विचारांची पेरणी होत असते. ते पुढे म्हणाले की, संत गाडगेबाबा दरवर्षी आषाढी एकादशीची दिंडी काढायचे, मात्र ते मंदिरात न जाता त्या परिसरातील अस्वच्छता पाहून स्वतः हातात झाडू घेऊन स्वच्छता करायचे. समाजाला स्वच्छतेचा संदेश देणारा हा आदर्श आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्यातून प्रेरणा घेत आपणही आपला परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवण्यासाठी पुढाकार घ्यायला हवा.



श्री स्वामी समर्थ मंदिर व बालसंस्कार केंद्राच्या सुशोभीकरण कामाच्या लोकार्पण सोहळ्यामध्ये बोलताना माजी उपमहापौर गणेश भोसले आदी. (छाया – लहू दळवी)

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देताना त्यांनी सांगितले की, पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी प्लास्टिक पिशव्यांचा वापर टाळून कापडी पिशव्यांचा वापर वाढवणे आवश्यक आहे. संत तुकाराम महाराजांनी 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे' असा संदेश देत वृक्षांचे महत्त्व समाजाला पटवून दिले होते. प्रत्येकाने किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन आणि संवर्धन करावे, ही काळाची गरज आहे.

यावेळी माजी महापौर भगवान फुलसौंदर म्हणाले की, सारसनगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात आल्यानंतर अक्कलकोटच्या पवित्र भूमीत आल्याचा भास होतो. येथे निर्माण झालेले अध्यात्मिक वातावरण मनाला समाधान देणारे आहे. संत–महंतांचे विचार समाजाला प्रेरणा, ऊर्जा आणि सकारात्मक दिशा देणारे आहेत. माणुसकी म्हणजे माणसातील माणूस ओळखणे, त्यांची सेवा करणे आणि समाजासाठी काहीतरी देणे हा खरा परमार्थ आहे.

यावेळी माजी नगरसेवक संजय चोपडा म्हणाले की, आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून श्री स्वामी समर्थ मंदिर परिसराच्या सुशोभीकरणासाठी निधी उपलब्ध झाला. त्या माध्यमातून हे काम पूर्णत्वास गेले असून आज त्याचा लोकार्पण सोहळा होत आहे. समाजोपयोगी आणि लोकहिताचे काम मार्गी लागल्याचे समाधान वाटत आहे.

सारसनगर येथील या कार्यक्रमास गणेश भोसले, भगवान फुलसौंदर, नगरसेवक प्रकाश भागानगरे, संजय चोपडा, नाना फुलसौंदर, संदीप फुलसौंदर, छबुराव कांडेकर, रमेश गांधी, नयन चेंगड्या, ज्ञानेश शिंदे, सागर बावके, यशवंत गारडे, प्रवीण सिंघवी, पुष्पा सुपेकर, विकास सुराणा यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नगरसेवक प्रकाश भागानगरे यांनी केले. मंदिर परिसराच्या विकासासाठी झालेल्या प्रयत्नांची माहिती त्यांनी उपस्थितांना दिली.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सागर बावके यांनी केले.

# कन्यारत्नाच्या आगमनाचे वृक्षारोपणाने स्वागत

**पवार कुटुंबीयांचा पर्यावरण संवर्धनाचा प्रेरणादायी उपक्रम; 'आजचे रोप उद्याचा श्वास' संकल्पनेतून मुलीच्या जन्माचा आनंद साजरा; मुलीच्या नावाने लावलेल्या रोपाचे संवर्धन करण्याचा निर्धार**

नगर – समाजात मुलीच्या जन्माचे विविध प्रकारे स्वागत केले जाते. मात्र, पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत मुलीच्या जन्माचा आनंद वृक्षारोपणाद्वारे साजरा करण्याचा प्रेरणादायी उपक्रम शहरातील पवार कुटुंबीयांनी राबविला आहे. घरात कन्यारत्नाचे आगमन झाल्यानंतर तिच्या नावाने रोपाची लागवड करून त्याचे संगोपन व संवर्धन करण्याचा संकल्प करण्यात आला. या उपक्रमातून मुलींचा सन्मान आणि पर्यावरण संरक्षण या दोन्ही मूल्यांचा सुंदर संगम घडवून आणण्यात आला.

निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या महिला जिल्हाध्यक्ष लतिका पवार यांची नात तसेच इंजि. प्रसाद पवार व प्रांजल पवार या दाम्पत्यांना नुकतेच कन्यारत्न प्राप्त झाले. कुटुंबात नव्या पाहुणीच्या आगमनाने आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून या आनंदाला पर्यावरण संवर्धनाची जोड देत कुटुंबीयांनी वृक्षारोपणाचा अनोखा उपक्रम राबविला.

'आजचे रोप उद्याचा श्वास' या संकल्पनेवर आधारित या उपक्रमांतर्गत कन्येच्या नावाने रोप लावण्यात आले. केवळ वृक्षारोपण न करता त्या रोपाचे नियमित संगोपन, संवर्धन व संरक्षण करण्याची जबाबदारीही कुटुंबीयांनी स्वीकारली आहे. वाढत्या शहरीकरणामुळे झपाट्याने कमी होत असलेले हरित क्षेत्र, वाढते प्रदूषण, हवामानातील बदल आणि तापमानवाढ या गंभीर समस्यांवर मात करण्यासाठी प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संगोपन करणे आवश्यक असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.



'आजचे रोप उद्याचा श्वास' संकल्पनेतून मुलीच्या जन्माचा आनंद साजरा करण्यात आला.

घरात लक्ष्मीच्या रूपाने आलेल्या कन्येचे स्वागत करताना वृक्षारोपण करण्यात आले. ज्या पद्धतीने मुलांचे संगोपन केले जाते, त्याच पद्धतीने या रोपाचेही संगोपन केले जाईल, अशी भावना कुटुंबीयांनी व्यक्त केली. मुलीचा जन्म आणि वृक्षारोपण यांचा संबंध जोडल्याने समाजात पर्यावरणाबाबत सकारात्मक जागरूकता निर्माण होण्यास मदत होणार आहे.

या प्रसंगी ब्रेन पॉवर सॉफ्टवेअरचे संचालक संतोष कदम, स्वाती कदम, प्रणव कदम, वीराझी पवार, सम्राज्ञी पवार यांच्यासह कुटुंबीय उपस्थित होते. उपस्थितांनी उपक्रमाचे कौतुक करत प्रत्येक कुटुंबाने अशाप्रकारे वृक्षारोपणाचा संकल्प स्वीकारण्याची गरज व्यक्त केली.

लतिका पवार म्हणाल्या, मुलगी ही घराची शान, कुटुंबाचा अभिमान आणि समाजाच्या प्रगतीची दिशा असते. कन्यारत्नाच्या आगमनाचा आनंद साजरा करताना पर्यावरण संवर्धनाची जबाबदारीही आपण विसरता कामा नये. झाडे ही पृथ्वीची फुफ्फुसे आहेत. भविष्यातील पिढ्यांना शुद्ध हवा, स्वच्छ वातावरण आणि हिरवाई लाभावी यासाठी प्रत्येक जन्म, वाढदिवस किंवा आनंदाचा क्षण वृक्षारोपणाशी जोडला गेला पाहिजे. आज लावलेले हे रोप उद्या मोठे वृक्ष बनून अनेकांना सावली, प्राणवायू आणि जीवन देईल. समाजातील प्रत्येक कुटुंबाने मुलीच्या जन्माचे स्वागत अशाच सकारात्मक उपक्रमांनी करण्याचे त्यांनी सांगितले.

इंजि. प्रसाद पवार म्हणाले, आमच्या कन्येच्या जन्मामुळे कुटुंबात आनंदाचे वातावरण आहे. हा आनंद केवळ कुटुंबापुरता मर्यादित न ठेवता समाजाला संदेश देणारा असावा, या उद्देशाने आम्ही वृक्षारोपणाचा निर्णय घेतला. मुलगी आणि झाड या दोघांच्याही संगोपनासाठी प्रेम, काळजी आणि सातत्य आवश्यक असते. आज लावलेले हे रोप आमच्या मुलीसोबत वाढत राहील. तिच्या प्रत्येक वाढदिवशी या झाडाचीही वाढ पाहण्याचा आनंद आम्हाला मिळेल. पर्यावरण संरक्षण ही काळाची गरज असून प्रत्येकाने किमान एक झाड लावून त्याचे संवर्धन करण्याची जबाबदारी स्वीकारण्याचे त्यांनी आवाहन केले.

# पाथर्डीची कन्या आदिती शिदोरेंची ऑस्ट्रेलियात चमकदार कामगिरी

पाथर्डी येथील मूळचे निवासी रूपचंद शिदोरे यांची दोन्ही मुलं अविनाश आणि विकास नोकरीनिमित्त ऑस्ट्रेलियातील सिडनी येथे कुटुंबीयांसह वास्तव्यास आहेत. पाथर्डी येथे जन्मलेली अविनाश यांची कन्या आदिती आई वडिलांसमवेत ऑस्ट्रेलियात शिक्षण घेत आहे. अविनाश रूपचंद शिदोरे हे ऑस्ट्रेलिया येथील रियल फूड इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत सुपरवायझर आहेत. त्यांची मुलगी कुमारी आदिती ही शिक्षणाबरोबर वयाच्या अकराव्या वर्षापासून ऑस्ट्रेलियात क्रिकेट खेळत आहे. तिच्यातील क्रिकेट कौशल्य वडिलांच्या लक्षात आले आणि त्यांनी तिला क्रिकेटचे धडे देण्यास सुरुवात केली. वडिलांच्या मार्गदर्शनाखाली कुमारी आदितीने क्रिकेट खेळात चमकदार कामगिरी करण्यास सुरुवात केली. अनेक प्रकारचे क्रिकेट पुरस्कार मिळवित कुमारी आदितीने भारतीय तिरंगा ऑस्ट्रेलियाच्या भूमीवर अभिमानाने फडकविला आहे. क्रिकेटमधील अष्टपैलू चमकदार कामानिमित्त तिला अनेक प्रकारचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत.



कुमारी आदितीच्या उत्कृष्ट खेळामुळे तिला १९ वर्षाखालील स्टेट क्रिकेट खेळाडू म्हणून तिची निवड झाली आहे. शाळेतील क्रिकेट टीमचे ती प्रतिनिधित्व करीत आहे. अनेक संस्था, भारतातील तिचे नातेवाईक, अहमदनगर येथे स्थायिक झालेले, मध्य रेल्वेतून मोटरमन पदावरून सेवानिवृत्त झालेले, तिचे आजोबा रूपचंद शिदोरे यांनी तिचे अभिनंदन केले आहे.

क्रिकेट खेळाबरोबरच कुमारी आदितीने जलतरण स्पर्धेतही सुवर्णपदक पटकावले आहे. शालेय शिक्षणातही ती अत्यंत हुशार आहे. गल्लीतील क्रिकेट पासून सुरुवात करणारी अदिती, स्टार क्रिकेटर झालेली आहे. तिला क्रिकेटर घडविण्यामध्ये तिचे वडील अविनाश शिदोरे यांचा मोलाचा वाटा आहे. वडील स्वतः चार चार तास तिच्याबरोबर ग्राउंडवर सराव करतात. घरातील प्रोत्सानामुळेच आदितीने एवढी मोठी मजल मारलेली आहे. भारतीय वंशाच्या आदिती शिदोरे, या कन्येला क्रिकेट खेळातील उत्तुंग अशा खेळा करिता हार्दिक हार्दिक शुभेच्छा. तू अशीच उंच उंच भरारी घेत जा. ह्याच सदिच्छा

**– शब्दांकन : पी. एन. डफळ, अहिल्यानगर, मो.नं.९४२२०८७४८८**

# शिवरायांच्या शौर्यपरंपरेचा वारसा जपणाऱ्या खेळाडूंचा सोहम स्पोर्टस् ॲकॅडमीतर्फे गौरव

नगर – छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून सोहम स्पोर्ट्स अॅकॅडमीतर्फे आयोजित करण्यात आलेल्या समर कॅम्पमधील सहभागी खेळाडूंचा मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला. या कार्यक्रमास पालक आणि खेळाडूंची उपस्थिती लाभली. सोहम स्पोर्टस् अॅकॅडमीतर्फे २० मे ते ५ जून या कालावधीत श्री श्रमिक बालाजी मंदिर परिसर तसेच श्री मार्कंडेय संकुल, दातरंगे मळा येथे एकाच वेळी समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात सहभागी विद्यार्थ्यांना लाठी–काठी, दांडपट्टा, तलवारबाजी आणि मल्लखांब यांसारख्या भारतीय परंपरेचा अभिमान असलेल्या युद्धकला व क्रीडाप्रकारांचे प्रशिक्षण देण्यात आले. याबाबतची सविस्तर माहिती अॅकॅडमीच्या वर्षा म्याकल यांनी आपल्या प्रास्ताविकातून दिली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा माजी उपमहापौर श्रीपाद छिंदम यांनी आपल्या मनोगतातून खेळाडूंना प्रेरणादायी मार्गदर्शन केले. आजचे विद्यार्थी हे उद्याचे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय खेळाडू आहेत. सोहम स्पोर्ट्स अॅकॅडमीतील खेळाडूंनी भविष्यात राज्यस्तरीय, राष्ट्रीय तसेच ऑलिम्पिक स्पर्धांमध्ये चमकदार कामगिरी करून शहराचे नाव उज्ज्वल करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

श्रमिकनगर परिसरातील नगरसेवक मनोज दुलम यांनी अॅकॅडमीच्या या उपक्रमाचे विशेष कौतुक केले. आजच्या मोबाईल आणि डिजिटल युगात मुलांना मैदानी खेळांकडे वळविण्याचे कार्य अत्यंत महत्त्वाचे आहे. भारतीय पारंपरिक खेळांमध्ये मुलांचा सहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या पालकांचेही त्यांनी विशेष अभिनंदन केले.

अॅकॅडमीचे प्रशिक्षक योगेश म्याकल यांनी सांगितले की, खेळाडूंना राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये सहभागी करून घेण्यासाठी अॅकॅडमी सातत्याने प्रयत्नशील आहे. विशेषतः मुलींसाठी स्वरक्षणाच्या दृष्टीने लाठी–काठी, दांडपट्टा आणि तलवारबाजीचे प्रशिक्षण ही काळाची गरज बनली आहे. आत्मविश्वास, शारीरिक सक्षमता, मानसिक धैर्य आणि संकटसमयी स्वतःचे संरक्षण करण्याची क्षमता या प्रशिक्षणातून विकसित होते. त्यामुळे पालकांनी सुट्टीच्या काळात मुलांना केवळ शैक्षणिक अभ्यासक्रमांपुरते मर्यादित न ठेवता अशा पारंपरिक युद्धकला प्रशिक्षणामध्ये सहभागी करून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले.



छत्रपती शिवाजी महाराज राज्याभिषेक दिनानिमित्त सोहम स्पोर्टस् ॲकॅडमीच्या समर कॅम्पमधील खेळाडूंना मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

यावेळी प्रशिक्षक सुरेश जाधव यांनी मल्लखांब, लाठी–काठी, दांडपट्टा आणि तलवारबाजी या भारतीय पारंपरिक क्रीडा व युद्धकलांचे महत्त्व विशद केले. मल्लखांब हा शरीरसौष्ठव, संतुलन, लवचिकता आणि एकाग्रता वाढविणारा खेळ असून तो भारताच्या गौरवशाली क्रीडा परंपरेचे प्रतीक आहे. तसेच लाठी–काठी, दांडपट्टा आणि तलवारबाजी या कला केवळ युद्धकला नसून आत्मसंरक्षण, शिस्त, धैर्य, चपळता, नेतृत्वगुण आणि निर्णयक्षमता विकसित करणाऱ्या प्रभावी प्रशिक्षण पद्धती आहेत. आजच्या काळात मुला–मुलींनी अशा पारंपरिक कलांचे प्रशिक्षण घेणे आवश्यक असून यामुळे शारीरिक व मानसिक सक्षमता वाढण्यास मोठी मदत होते, असे त्यांनी सांगितले.

यावेळी वक्त्यांनी मल्लखांब, लाठी–काठी, दांडपट्टा आणि तलवारबाजी या केवळ खेळ नसून भारतीय संस्कृती, शौर्य आणि स्वाभिमानाचे जिवंत प्रतीक असल्याचे सांगितले. मल्लखांबामुळे शरीराची लवचिकता, संतुलन, एकाग्रता आणि शारीरिक क्षमता विकसित होते. लाठी–काठी, दांडपट्टा आणि तलवारबाजीमुळे आत्मसंरक्षणाची कला, चपळता, धैर्य, शिस्त आणि नेतृत्वगुणांचा विकास होतो. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची प्रेरणा देणाऱ्या या पारंपरिक कला आजच्या पिढीपर्यंत पोहोचविणे ही काळाची गरज असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी खेळाडूंना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मेडल व प्रमाणपत्र प्रदान करून सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी श्रमिक बालाजी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष विनोद म्याना, महेश सब्बन, महावितरणचे उपव्यवस्थापक अजय म्याना तसेच पालकवर्ग उपस्थित होते.

मल्लखांब, लाठी–काठी, दांडपट्टा, तलवारबाजी तसेच इतर पारंपरिक क्रीडा प्रशिक्षणाबाबत अधिक माहितीसाठी आणि प्रवेश नोंदणीसाठी इच्छुक पालक व विद्यार्थ्यांनी सोहम स्पोर्ट्स अॅकॅडमीशी संपर्क साधावा.(८८८८२३०३९०)



राज्यस्तरीय शूटिंग स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणारे खेळाडू.

# राज्यस्तरीय शूटिंग स्पर्धेत नगरच्या खेळाडूंची दमदार कामगिरी; अहिल्यानगरच्या सात नेमबाजांची सब नॅशनल स्पर्धेसाठी निवड

नगर – शहरातील खेळाडूंनी मुंबई येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय रायफल शूटिंग स्पर्धेत पदकांची कमाई करुन उल्लेखनीय यश संपादन करत आपल्या कौशल्याचा ठसा उमटवला आहे. अहिल्यानगर सिटी रायफल अॅण्ड पिस्तोल स्पोर्ट्स शूटिंग क्लबच्या तब्बल ७ खेळाडूंनी उत्कृष्ट नेमबाजी करत सब नॅशनल स्पर्धेसाठी आपली निवड निश्चित केली आहे.

या स्पर्धेत १० मीटर एअर रायफल प्रकारात किर्ती चक्रवर्ती हिने कास्य पदक मिळवले. तसेच ५० मीटर ३ पोझीशन रायफल प्रकारात कार्तिक कोल्हे याने चौथ क्रमांक मिळवला. आयुष काळे, आदेश खर्डे, पार्थ शिंदे यांनी अचूक निशाण साधत यश मिळवले. तर १० मीटर एअर पिस्तोल प्रकारात रेवा शिंदे, अश्विनी महानूर यांनी उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्याचा नावलौकिक वाढवला.

या खेळाडूची गोवा येथे होणाऱ्या सब नॅशनल स्पर्धेसाठी निवड झाली असून या सर्व खेळाडूंना प्रशिक्षक अलीम शेख, ऋषिकेश दरंदले आणि सागर फाटके यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच क्लबच्या सेक्रेटरी सुनीता लिपने यांनी खेळाडूंच्या तयारीसाठी विशेष प्रयत्न केले.

# सायकलिंग स्पर्धेतून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडतील

**जगदिश भांबळ यांचे प्रतिपादन; अस्मिता खेलो इंडिया वूमेन्स लीग सायकलिंग स्पर्धेचे पारितोषिक वितरण, रोख ८० हजार रुपये बक्षीस, प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन गौरव**

नगर – सायकलिंग असोसिएशन ने अहिल्यानगर जिल्ह्यात अस्मिता खेलो इंडिया सायकलिंग लीग स्पर्धेच्या माध्यमातून अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंना राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय खेळाडू होण्यासाठी संधी निर्माण केली आहे. उत्कृष्ट पद्धतीने नियोजन करून सायकलिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यामुळे सायकलिंग या खेळातील स्पर्धकांना प्रोत्साहन मिळत आहे. या स्पर्धेला जिल्ह्यातील खेळाडूंनी उस्फूर्त प्रतिसाद नोंदविला आहे. सायकलिंग स्पर्धेतून राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय खेळाडू घडतील, असे प्रतिपादन तोफखाना पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांनी केले आहे.



अस्मिता खेलो इंडिया वूमेन्स लीग सायकलिंग स्पर्धेचे पारितोषिक वितरण करण्यात आले.

अहिल्यानगर येथे पेमराज सारडा महाविद्यालयात राष्ट्रीय सायकलिंग महासंघ, खेलो इंडिया आणि सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, सायकलिंग असोसिएशन ऑफ अहिल्यानगर, ईनिफिटी सायकलिंग अॅकॅडमी, जिल्हा क्रिडाधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने अस्मिता खेलो इंडिया वुमेन्स सायकलिंग लीग व जिल्हास्तरीय सायकलिंग स्पर्धेचे पारितोषिक वितरण समारंभ तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या हस्ते झाला. याप्रसंगी सारडा महाविद्यालयाचे उपप्राचार्य गिरीश पाखरे, शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलिस निरीक्षक बाबासाहेब बोरसे, शिवछत्रपती पुरस्कार विजेते निर्मल थोरात, ऑलम्पिक अ.नगर असोशियशनचे सचिव शैलेश गवळी, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयाचे विशाल गर्जे, सायकलिंग असोसिएशन महाराष्ट्राचे सचिव प्रा.संजय साठे, सायकलींग असो.अ.नगरचे अध्यक्ष साईनाथ थोरात, क्रीडा शिक्षक घनशाम सानप, कल्पेश भागवत, प्रा.संजय धोपावकर, प्रा.रावसाहेब बाबर, अविनाश काळे, योगिता वाणी, संभाजी मोहिते, विनायक भूतकर आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात प्रा.संजय साठे म्हणाले, जागतिक सायकल दिन हा उत्साहाने साजरा करण्यात आला आहे. अस्मिता खेलो इंडिया वुमन्स लीग सायकलिंग स्पर्धेमुळे खेळाडूंना प्रोत्साहन मिळत आहे. तसेच या सायकलिंग स्पर्धेतून मोठ्या प्रमाणावर राष्ट्रीय खेळाडू घडतील. या स्पर्धेला जिल्ह्यातील खेळाडूंनी मोठा प्रतिसाद दिला आहे. या स्पर्धा यशस्वी होण्यासाठी अहिल्यानगर पोलीस दल, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, शहर वाहतूक नियंत्रण शाखा, जिल्हा रुग्णालय, पेमराज सारडा महाविद्यालय आदींचे विशेष सहकार्य लाभले आहे. या स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंना रोख ८० हजार रुपये रोख बक्षीस, प्रमाणपत्र व ट्रॉफी देऊन विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

या स्पर्धेचे मुख्य पंच म्हणून प्रा.संजय साठे, प्रा.साईनाथ थोरात, रावसाहेब बाबर, शैलेश गवळी, कल्पेश भागवत, घनश्याम सानप, विशाल गर्जे, अविनाश काळे, विनायक भुतकर, प्रा.संजय धोपावकर, दिनेश भालेराव, योगिता वाणी आदींनी परिक्षण केले.

सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले. साईनाथ थोरात यांनी आभार मानले.

# दूरदर्शनची बी–हाय ग्रेड कलाकार म्हणून अहिल्यानगरच्या नताशा पंडितची निवड

नगर – नताशा पंडित हिची मुंबई दूरदर्शनची बी–हाय ग्रेड कलाकार म्हणून नुकतीच निवड झाली आहे. मुंबई दूरदर्शने जाहीर केलेल्या मान्यताप्राप्त कलाकारांमधे कु. नताशा हिची भरतनाट्यम नृत्य कलावंत म्हणून निवड करण्यात आली. चेन्नई दूरदर्शनची ती मान्यताप्राप्त कलाकार असून चेन्नई दूरदर्शनवर तिने नृत्यकलेचे सादरीकरण देखील केले आहे.



अहिल्यानगरच्या श्री गुरुमाऊली संगीत विद्यालयाच्या संचालिका सौ. वर्षा पंडित आणि चंद्रकांत पंडित यांची कन्या आहे. कु. नताशा हिने आपली आई नृत्यतपस्वी सौ.वर्षा पंडित यांचे कडून प्रेरणा घेऊन आपली कला जोपासली व पुढे वृद्धिंगत केली. भरतनाट्यमच्या गांधर्वच्या परिक्षांमधे उत्तम गुण प्राप्त करत ती विशारद उत्तीर्ण झाल्यानंतर चेन्नई येथील कलाक्षेत्र फाऊंडेशन या नामांकित संस्थेमधून नृत्याचे पुढील शिक्षण घेतले. त्यानंतर चेन्नईतील सहृदय फाऊंडेशनचे शिजीत कृष्ण यांचेकडे भरतनाट्यमचे अँडव्हान्स शिक्षण घेतले तसेच भरतनाट्यम मध्येच एम ए पदवीही प्राप्त केली.

सध्या ती नृत्य साधकांना नृत्यकलेचे शिक्षण देत आहे. नताशा एक उत्तम शास्त्रीय नृत्यांगना तर आहेच पण त्याबरोबरच इतरही अनेक उत्तमोत्तम कला व कौशल्ये तिच्याकडे आहेत. इतक्या व्यस्ततेतूनही चित्र काढणे, कविता करणे, फोटोग्राफी या सारखे छंदही ती जोपासत असते.

# डॉ. वर्धमान कांकरिया ठरले जगातील 'अव्वल नेत्रतज्ज्ञ'

**एक मोठा आंतरराष्ट्रीय सन्मान**

नगर – नेत्रतज्ञ व लेसर नेत्र शस्त्रक्रिया तज्ञ डॉ. वर्धमान प्रकाश कांकरिया यांना अतिशय दुर्मिळ जगातील उच्च सन्मान मिळाला असून जगातील पहिल्या ५० नेत्रतज्ञात त्यांची वर्णी लागली आहे. डॉ वर्धमान कांकरिया हे एशियन आय हॉस्पिटल पुणेचे संस्थापक असून मोतीबिंदू आणि रिफ्रॅक्टिव्ह सर्जरी क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय योगदानासाठी डॉ. कांकरिया यांना हा सन्मान मिळाला आहे. पुण्यातील एशियन आय हॉस्पिटलचे संचालक असलेले डॉ. कांकरिया हे भारतातील आघाडीचे LASIK, रोबोटिक मोतीबिंदू आणि दृष्टीदोष सुधारणा शल्यविशारद म्हणून ओळखले जातात. अमेरिकास्थित प्रतिष्ठित जागतिक रँकिंग प्लॅटफॉर्म Expertscape USA ने ही मानाची यादी जाहीर केली असून, त्यात डॉ. वर्धमान कांकरिया यांचा समावेश करण्यात आला आहे. या यादीत भारतातील अन्य नामवंत नेत्रतज्ज्ञांमध्ये दिल्लीतील AIIMS च्या प्रा. डॉ. नम्रता शर्मा आणि बंगळुरूतील डॉ. रोहित शेट्टी यांचाही समावेश आहे.



२०१० पासून नेत्रविज्ञान क्षेत्रात संशोधन, नवकल्पना आणि अत्याधुनिक उपचारपद्धतींच्या माध्यमातून डॉ. वर्धमान कांकरिया यांनी पुण्यात आंतरराष्ट्रीय दर्जाचे एशियन आय हॉस्पिटल स्थापन करून एक लाखापेक्षाही अधिक लेसर नेत्रशस्त्र क्रिया केल्या त्यांची लिम्का बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड मध्ये नोंद झालेली आहे. तर –३० पर्यंतचा अतिशय मोठा चष्म्याचा नंबर घालवून जगाला मोठा आश्चर्याचा धक्का दिला आहे. वैद्यकीय क्षेत्रातील संशोधन, वैज्ञानिक प्रकाशने, शैक्षणिक प्रभाव आणि जागतिक स्तरावरील योगदान या निकषांच्या आधारे Expertscape जगभरातील तज्ज्ञ डॉक्टरांची निवड व क्रमवारी निश्चित करते. डॉ वर्धमान कांकरिया यांचे शालेय शिक्षण अहिल्यानगरयेथे तर वैद्यकीय शिक्षण वैद्यकीय महाविद्यालय मुंबई, शंकर नेत्रालय चेन्नई व अमेरिकेत विशेष अभ्यास झाला आहे तसेच जगभर विविध ठिकाणी नेत्र परिषदेमध्येही त्यानी विशेष सहभाग नोंदविला आहे. ह्या मिळालेल्या जागतिक सन्मानाचे श्रेय ते त्यांच्या आई–वडिलांना कुटुंबीयांना एशियन आय हॉस्पिटल ला व सेवेची संधी दिल्यामुळे समाजाला देतात.

## डॉ. कांकरिया यांच्या नावावर अनेक विक्रम

डॉ. कांकरिया यांच्या नावावर अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विक्रम नोंदवले गेले आहेत. भारतात सर्वाधिक LASIK शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरांपैकी एक म्हणून त्यांची लिम्का बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये नोंद आहे. तसेच, मायनस ३० डायॉप्टर इतका अत्यंत गंभीर चष्म्याचा नंबर अत्याधुनिक रिफ्रॅक्टिव्ह सर्जरीद्वारे यशस्वीरित्या सुधारण्याची उल्लेखनीय कामगिरीही त्यांनी केली आहे.

# अखिल भारतीय सब ज्यु.बॅडमिंटन स्पर्धेत अहिल्यानगरच्या विधी सैनी व ख्याती खत्रे या जोडीने पटकाविले दुहेरीचे कास्य पदक

नगर – हैदराबाद येथे २९ मे ते ५ जुन रोजी झालेल्या योनेक्स–सनराईज ऑल इंडिया सब ज्युनि. (U-15 d U-17) रँकिंग बॅडमिंटन स्पर्धा –२०२६' मध्ये मुलींच्या दुहेरीत U-15 गटात उल्लेखनीय खेळ करत अहिल्यानगरच्या विधी सैनी या खेळाडुने ख्याती खत्रे हिच्या साथीने कांस्यपदक पटकावले आहे. या स्पर्धेत या वयोगटात विविध राज्यातील १५० खेळाडचा सहभाग होता.



ख्याती कत्रे हिच्या साथीने खेळताना, विधीने ३२ व्या फेरीपासून ते उपांत्यपूर्व फेरीपर्यंत सलग सेटमध्ये विजय मिळवत अपवादात्मक सातत्य दाखवले, उपांत्य फेरीत जया सप्त आणि अलेक्झांडर एल्सा यांच्याविरुद्ध कडवी झुंज देऊनही त्यांनी संपूर्ण स्पर्धेत कौतुकास्पद खेळी केली. विधी हि अहिल्यानगरच्या मॅक्सिमस स्पोर्टस् अकॅडमी मध्ये बॅडमिंटन चे धडे घेत असुन ख्याती पुण्याला प्रशिक्षण घेते.

कु.विधीला तिचे प्रशिक्षक रोहितसर, नविन सर, प्रशिक्षक सोनाली यांचे मार्गदर्शन मिळत आहे. विधी सध्या साई एंजल्स इंटरनॅशनल स्कूलमध्ये इयत्ता ९ वी मध्ये शिकत असून तिची बॅडमिंटनमधील यशस्वी घोडदौड कायम आहे.

# जोश



## चटपटीत चिप्स भेळ

**झटपट रेसिपी**

दोस्तांनो, संध्याकाळच्या वेळी काहीतरी चटपटीत खावंसं वाटतं. अशावेळी पटकन भेळेचा पर्याय निवडला जातो. भेळ म्हटली की चुरमुरे हवेत. पण तुमच्याकडे बटाटा वेफर्सचं एखादं पाकिट असलं तरी भेळ बनवता येईल. चला तर मग, पटकन होणारी ही रेसिपी ट्राय करू या.

**सामग्री:** बटाटा वेफर्स, चिरलेला कांदा, टॉमेटो, हिरव्या मिरच्या, फरसाण, शेव, लिंबाचा रस

**कृती:** बटाटा वेफर्सचे छोटे तुकडे करा. त्यात कांदा, टोमॅटो आणि हिरव्या मिरच्या घाला. नीट मिसळून घ्या. मग फरसाण आणि शेव घालून थोडा लिंबाचा रसही घाला. सर्व घटक नीट मिक्स करा. वेफर्स, फरसाणात मीठ असतंच. तुमच्या चवीनुसार मीठ घाला. वरून कोथिंबिरही घालता येईल. संध्याकाळच्या चहासोबत ही चिप्स भेळ मस्त लागेल. इतकंच नाही तर मित्रमंडळींकडून तुमच्या कल्पकतेचं कौतुकही होईल.

## नवकल्पनेच्या जोरावर बनवला ब्रँड

**अचिव्हर**

एकेकाळी लहान समजले जाणारे व्यवसाय आज आधुनिक व्यवस्थापन, ब्रँडिंग आणि ग्राहककेंद्री दृष्टिकोनामुळे कोट्यवधी रुपयांच्या उद्योगांमध्ये रूपांतरित होत आहेत. रस्त्याच्या कडेला दहा-वीस रुपयांत मिळणारे पान हा अनेकांच्या दृष्टीने किरकोळ व्यवसायाचा भाग असू शकतो; पण योग्य दृष्टी, नियोजन आणि नवकल्पना असेल, तर हाच व्यवसाय राष्ट्रीय स्तरावरील ब्रँड बनू शकतो, हे पी. एन. ठाकूर यांच्या यशोगाथेने दाखवून दिले आहे.

'मस्त बनारसी पान' या नावाने देशभरात ओळख निर्माण करणारे पी. एन. ठाकूर बिहारमधील शेतकरी कुटुंबातून आलेले युवक आहेत. त्यांनी बनारस हिंदू विद्यापीठातून एमबीए केले आणि इतर तरुणांप्रमाणे नोकरीही सुरू केली; मात्र स्वतःचा व्यवसाय उभारण्याची इच्छा त्यांच्या मनात कायम होती. बनारसच्या पान संस्कृतीकडे त्यांनी केवळ खाद्यपदार्थ म्हणून पाहिले नाही, तर त्यामध्ये मोठ्या व्यावसायिक संधी शोधल्या. आज त्यांची कंपनी देशातील शेकडो शहरांमध्ये पोहोचली असून चारशेहून अधिक आउटलेट्सद्वारे कोट्यवधींचा व्यवसाय करत आहे.

भारतातील अनेक छोटे व्यवसाय वर्षानुवर्षे एकाच पद्धतीने चालत आले. पान टपऱ्या, चहाची दुकाने, स्थानिक खाद्यपदार्थ विक्रेते किंवा छोट्या सेवा व्यवसायांमध्ये ग्राहकांच्या अनुभवापेक्षा केवळ विक्रीवर भर दिला जात असे. स्वच्छता, सादरीकरण, ब्रँडिंग आणि ग्राहक मानसशास्त्र या गोष्टींकडे विशेष लक्ष दिले जात नव्हते. ठाकूर यांनी हाच दृष्टिकोन बदलला. त्यांनी पान विक्रीला आधुनिक 'कॅफे संस्कृती'शी जोडले. स्वच्छ, आकर्षक आणि व्यवस्थित दुकानांमध्ये पान विकण्याची संकल्पना त्यांनी पुढे आणली. तंबाखूमुक्त आणि विविध फ्लेवर्स असलेले पान त्यांनी बाजारात आणले. चॉकलेट पान, ड्रायफ्रूट पान, आईस्क्रीम पान, सिल्व्हर आणि गोल्ड पान यांसारख्या संकल्पनांनी ग्राहकांचे लक्ष वेधले. पारंपरिक उत्पादनाला आधुनिक रूप देण्याची हीच यशाची गुरुकिल्ली ठरली.



त्यांच्या यशामागे आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणजे फ्रँचायझी मॉडेल. भारतात अनेक लहान व्यवसाय वैयक्तिक पातळीवर यशस्वी होतात; पण विस्ताराच्या टप्प्यावर अडकतात. कारण व्यवस्थापन, गुणवत्ता नियंत्रण आणि आर्थिक नियोजनाचा अभाव असतो. ठाकूर यांनी मात्र नियोजनबद्ध पद्धतीने व्यवसाय वाढवला. बाहेरील मोठी गुंतवणूक न घेता टप्प्याटप्प्याने विस्तार केला. त्यामुळे व्यवसायावर नियंत्रणही राहिले आणि ब्रँडची ओळखही मजबूत झाली. आजचा ग्राहक केवळ उत्पादन विकत घेत नाही, तर तो अनुभव विकत घेतो. स्वच्छता, सादरीकरण, वातावरण आणि ब्रँडची प्रतिमा यांना आता तितकेच महत्त्व आहे. 'मस्त बनारसी पान'ने याच मानसशास्त्राचा योग्य वापर केला. पान खाणे हा केवळ सवयीचा भाग न राहता तो एक 'अनुभव' बनवण्यात त्यांनी यश मिळवले.



## प्रवासात पुरुषांना सोईचे कपडे

**फॅशन पॅशन**

पुरुषांच्या कपड्यांबद्दल अनेक निवडी असल्या, तरी ते तसे फॅशन कमी करतात. त्याच्या कपाटात सामान्यत: जीन्स व टी- शर्ट शिवाय आपल्याला काही सापडत नाही. आपल्याला प्रवास आरामदायी हवा असतो. त्यात कोणतीही अडचण नको असते. टी-शर्ट हे प्रवासातील सर्वोत्तम आरामदायी कपडे मानले जातात. तसेच ते आपल्या बॅगमध्ये सहज बसणारे व स्टायलिश दिसणारे कपडे आहेत.

कंटाळवाण्या दिवसापासून ब्रेक मिळावा म्हणून आपण प्रवास करत असतो. फिरायला गेल्यानंतर समुद्रकिनाऱ्यावर फेरफटका मारणे किंवा नवीन शहर एक्सप्लोर करणे असो, छान दिसणे आणि आरामदायी राहणे हे सहज प्रवास अनुभवासाठी आवश्यक आहे. चांगले दिसण्यासाठी आणि आरामशीर वाटण्यासाठी हे करून पाहा



✽ बेसिक रॉ एज टीज

बेसिक रॉ एज टीज आपल्यासारख्या चपखल लोकांसाठी एक प्रीमियम आणि स्वच्छ लूक देऊ शकतात. ते खरेदी करताना आपण पोत, लाइक्रा आणि रंगांच्या बँडसह आपण खरेदी करू शकतात. लाइक्राने बनवलेले कपडे आपला प्रवास आरामदायी बनवू शकतात त्यासाठी प्रवासात आपण या कपड्याचे परिधान करायला हवे.

✽ सॉलिड टी-शर्ट

आपल्याला नेहमीच्या 'सॉलिड टी-शर्ट'चा कंटाळा आला असेल तर आपण पॉपकॉर्न कॅज्युअल टीजची निवड करू शकतो. त्यात असणाऱ्या गळ्याची प्रीमियम रचना आपल्याला प्रवासासाठीच सोयीस्कर नाही, तर संध्याकाळच्या पार्टीसाठीदेखील आरामदायी ठरू शकते. पॉपकॉर्नच्या टेक्श्चरमुळे त्याला स्टायलिश लूक मिळतो आणि हेरिंगबोन नेकमुळे नवा लूक आपल्याला मिळू शकतो.

✽ ऑल-राउंड मेरिनो वूल टीज

विविध कार्यक्रम किंवा प्रसंगांसाठी 'ऑल-राउंड मेरिनो वूल टीज' सोबर असतात. हे टी मेरिनो वूल आणि नायलॉनच्या कॉम्बोने बनवली असून ते अतिशय आरामदायक असतात. ते आपल्या शरीराचे तापमान नियंत्रित करण्यात मदत करतात आणि आपली त्वचा संरक्षित ठेवण्यासाठी 'अँटी-मायक्रोबियल' असतात. प्रवासात आपल्याला घाम व इतर गोष्टींपासून ते लांब ठेवू शकतात. हे टीज स्पर्शाला मऊ, टिकाऊ आणि तरतरीत असतात.

✽क्विक-ड्राय टीज

प्रवासात आपल्याला सतत घाम येतो. त्यामुळे प्रवास करण्याचा अधिक वैताग येतो अशावेळी आपण क्विक-ड्राय टीजची चॉईस करू शकतो. त्यामुळे आपल्याला घाम येणार नाही व आपली त्वचा कोरडी राहील. हे टीज मऊ आणि आरामदायी असतात व प्रवासात यांना उत्तम पर्याय मानले जाते. आपल्या ट्रॅव्हल बॅगमध्ये क्विक ड्राय टी नेहमी असायला हवी.

## दीर्घकाळ स्मरणात राहण्यासाठी..

**स्टडी टिप्स**

मुलांसाठी परीक्षेची तयारी करणं हे सर्वात कठीण काम असतं. कमी वेळात इतक्या गोष्टी लक्षात ठेवणं कठीण होतं. या टिप्स वापरून अभ्यास केल्यास परीक्षेत चांगले गुण मिळू शकतात

**✽ नोट्स काढा**

कॉलेजमध्ये शिकवल्या जाणाऱ्या विषयांच्या नोट्स बनवा. त्या शेवटी वाचायला सोप्या वाटतील. कोणत्याही विषयाच्या पुस्तकी भाषेत नोट्स बनवू नका. शिक्षक बोलतात तेच वहीत लिहा. वहीतील रेखाचित्रांद्वारे गोष्टी लहान स्वरूपात तयार करा. जेव्हा तुम्ही परीक्षेत ते पुन्हा कराल, तेव्हा तुम्हाला समजण्यास कोणतीही अडचण येणार नाही. याशिवाय, विषयांमधील संबंध समजून घेण्याचा प्रयत्न करा. असे केल्याने तुम्हाला एकाच वेळी एकच नाही तर अनेक विषय आठवतील.



**✽ फ्लॅशकार्ड तयार करा**

महत्त्वाच्या विषयांचे फ्लॅशकार्ड तयार करा आणि ते पुस्तकात चिकटवा. यामुळे परीक्षेदरम्यान गोष्टी लक्षात ठेवण्यात अडचण येणार नाही. शिवाय पुस्तकांमध्ये हायलाईटर वापरा. सराव चाचण्या द्यायला सुरूवात करा. सराव चाचण्या दिल्याने केलेला अभ्यास लक्षात राहण्यास मदत होईल. वारंवार चाचण्या दिल्याने चांगला सराव होतो. ५ विषय असतील तर दररोज २-३ विषयांच्या चाचण्या द्या. जुन्या प्रश्नपत्रिका सोडवून तयारी करा. दृश्य साधनांचा वापर केल्यास विषय लक्षात ठेवण्यास मदत होईल. त्यामुळे विषयांबद्दलच्या आकलनाचं मूल्यांकन करण्यातही मदत होईल. विषयांच्या एमसीक्यू प्रश्नांची उत्तरे दिल्यास चांगली रिव्हिजन होईल.

## फंडू एसएमएस

| | | |
|---|---|---|
| धडकने लगे दिल की तारों की<br>दुनिया जब तुम मुस्कुरा दो,<br>संवर जाए हम बेकरारों की<br>दुनिया जब तुम मुस्कुरा दो। | उनकी चाहत में हम<br>कुछ यूं बंधे हैं।<br>वो साथ भी नहीं,<br>हम अकेले भी नहीं। | खामोश सा शहर और<br>गुफ्तगू की आरजू,<br>हम किससे करे बात<br>कोई बोलता ही नहीं। |

**स्मार्ट टॉक**

### टायर देईल अपघाताची पूर्वसूचना



आता गाडीचे टायर स्मार्ट बनत आहेत. जगप्रसिद्ध कंपनी पिरेलीने नवा 'सायबर टायर' लाँच केला आहे. हा टायर स्मार्ट सेन्सर्स आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) ने सुसज्ज आहे. तो रस्त्याची स्थिती, टायरचा हवेचा दाब आणि पकड याची रिअल टाइम माहिती गाडीला देतो. अपघात होण्यापूर्वीच चालकाला सावध करतो आणि ड्रायव्हिंग खूप सुरक्षित बनवतो.

सोप्या भाषेत सांगायचे तर सायबर टायर हा सामान्य टायर नाही. त्यात प्रगत सेन्सर्स बसवले आहेत. हे सेन्सर्स सतत टायरमधील हवा, तापमान, रस्त्यावरील पकड आणि टायरची स्थिती तपासत असतात. ही सर्व माहिती थेट गाडीच्या कॉम्प्युटर सिस्टीममध्ये जाते. गाडीला रस्त्याची खरी परिस्थिती समजते आणि चालकाला मदत होते. फक्त माहिती देण्यापुरते हे थांबत नाही. यात 'एआय' आणि 'स्मार्ट डेटा प्रोसेसिंग सिस्टीम' जोडली आहे. रस्ता निसरडा किंवा पाण्याने भरलेला असेल तर गाडी आपोआप ब्रेकिंग आणि ट्रॅक्शन कंट्रोल सिस्टीम बदलते. यामुळे अपघातांचा धोका खूप कमी होतो. गाडी स्वतः हुशारीने वागते. टायर रस्त्याशी थेट संपर्कात असतो. म्हणून खड्डे, खराब रस्ता, निसरडे भाग किंवा पाणी याची माहिती सर्वात आधी टायरलाच मिळते. ही माहिती लगेच गाडीला पाठवली जाते. चालकाला डॅशबोर्डवर किंवा आवाजात सूचना मिळते. त्यामुळे वेळीच सावध होऊन तो वेग कमी करू शकतो किंवा सावकाश चालवू शकतो. या नव्या टायरमुळे ड्रायव्हिंगचा आनंद वाढतो. चालकाला टायरची स्थिती, सर्व्हिस कधी घ्यायची, टायर बदलायचे का याचे रिअल टाइम अपडेट मिळतात. गाडी जास्त ॲक्टिव्ह होते आणि इंधन किंवा बॅटरीचीदेखील बचत होते. हे तंत्रज्ञान इलेक्ट्रिक गाड्या, लक्झरी कार आणि ऑटोमॅटिक वाहनांमध्ये मोठ्या प्रमाणात वापरले जाईल.

**टेक्नो वर्ल्ड**

### क्यूआर कोड अनिवार्य होणार



इंटरनेटवर एखादी वेबसाइट उघडताना दिसणारा 'आय ॲम नॉट अ रोबो' हा संदेश आता इतिहासजमा होऊ शकतो. एआय आणि स्मार्ट बॉट्सना रोखण्यासाठी गुगल आता जुन्या कॅप्चा प्रणालीला बदलून स्मार्टफोन-लिंक्ड क्यूआर कोड पडताळणी प्रणाली आणण्याच्या तयारीत आहे. या नवीन तंत्रज्ञानामुळे बनावट ट्रॅफिक आणि बॉट्सना रोखणे अधिक प्रभावी होणार आहे.

'गूगल' आता खरे वापरकर्ते आणि बॉट्स यांच्यात फरक करणे सोपे करण्यासाठी एका नवीन मार्गाचा शोध घेत आहे. सध्या हे फिचर प्राथमिक टप्प्यात असल्याचे म्हटले जात आहे आणि 'गूगल'ने अजूनही त्याचा संपूर्ण तपशील समोर आणलेला नाही. भविष्यात कंपनी काही विशिष्ट वेबसाइट्स आणि सेवांवर याची चाचणी घेऊ शकते. 'गूगल' वेबसाइट उघडल्यावर एक 'क्यूआर' कोड दाखवेल अशी प्रणाली विकसित करत आहे. वापरकर्त्यांना हा 'क्यूआर कोड' त्यांच्या स्मार्टफोनने स्कॅन करावा लागेल. त्यानंतर फोन वेबसाइटला संकेत देईल, की त्यांच्या समोर असलेली व्यक्ती ही एक खरी व्यक्ती आहे, स्वयंचलित बॉट नाही. ही प्रणाली सध्याच्या कॅप्चा प्रणालीची जागा घेऊ शकते. सध्या, बहुतेक वेबसाइट्सवर चित्र ओळखणे, ट्रॅफिक लाइट निवडणे किंवा मजकूर टाइप करणे आवश्यक असते. नवीन प्रणालीमध्ये ही प्रक्रिया बरीच वेगळी असू शकते.

'गूगल' बऱ्याच काळापासून 'रीकॅप्चा' प्रणाली वापरत आहे. सुरुवातीला, ती बरीच प्रभावी मानली जात होती; पण आता एआय तंत्रज्ञान इतके प्रगत झाले आहे, की अनेक बॉट्स सहजपणे कॅप्चा चाचण्या पार करतात. 'गूगल'चा विश्वास आहे की फोन-लिंक्ड व्हेरिफिकेशन अधिक सुरक्षित असू शकते, कारण त्यामुळे मूळ डिव्हाइस आणि वापरकर्त्याची ओळख शोधणे सोपे होईल. यामुळे बनावट खाती, स्पॅम आणि बॉट कमी होण्यास मदत होऊ शकते.



## फायदे सायकलिंगचे

**फिटनेस फंडा**

मित्रमंडळींसोबत सायकलिंगचा आनंद घेताना खूप धमाल येते. भटकंतीला गेल्यावर आपण सायकलिंग करतो. पण दोस्तांनो, नियमित सायकलिंग करायला हवं. याचे अनेक लाभ आहेत. फिटनेसच्या दृष्टीने सायकलिंग कसं उपयुक्त ठरतं याविषयी...

✽ सायकलिंगमुळे फक्त पायांना व्यायाम मिळतो असं नाही. तर हा एक परिपूर्ण व्यायाम आहे. सायकलिंगमुळे शरीर बळकट होतं.

✽ सायकलिंगमुळे मासनिक आरोग्य उत्तम रहातं. ताण कमी होतो. मित्रमंडळींसोबत छान गप्पा मारत सायकलिंग केल्यावर मन प्रफुल्लित होतं. काही बागांमध्ये सायकल ट्रॅक्स असतात. निसर्गाच्या सानिध्यातही खूप छान वाटतं.

✽ सायकलिंगमुळे झटपट वजन कमी होतं. यामुळे प्रत्येक अंगाचा व्यायाम होत असल्याने अतिरिक्त फॅट्स जाळायला मदत होते.

✽ सायकलिंग हृदयाच्या आरोग्यासाठी उत्तम मानलं जातं. यामुळे श्वसनाचं तंत्र सुधारतं. आपला स्टॅमिना वाढतो. त्यामुळे दररोज किमान अर्धा तास सायकल चालवायला हवी.

## छंदाला व्यावसायिकतेची जोड

**वेगळ्या वाटा**

बऱ्याच तरुणांना नोकरीऐवजी उद्योग करायचा असतो. काहींना फोटो काढण्याचा छंद असतो. काही गायन, वादनात पुढे असतात. काहींची चित्रकला, शिल्पकला चांगली असते. तुम्ही तुमच्या या छंदाचंच व्यवसायात रुपांतर करू शकता. छंदांच्या माध्यमातून उद्योगाचं गणित जुळवणारी अनेक मंडळी आपल्या आसपास आहेत. छंदांना व्यवसायाचं रुप देण्यासाठी नेमकं काय करायला हवं याविषयी...

✽ सर्वात आधी तुमच्या छंदांची यादी करा. तुम्ही नेमके कशात कुशल आहात याचा अंदाज घ्या. तुमचा हा छंद चांगलं उत्पादन किंवा सेवा म्हणून कशाप्रकारे सादर करता येईल याचा विचार करा.



✽ यादी केल्यानंतर बाजारपेठेबाबत थोडं संशोधन करा. यामुळे तुम्हाला भावी ग्राहक, त्यांच्या आवडीनिवडी याबद्दल कळू शकेल. त्यांच्यापर्यंत कसं पोहोचायचं हे तुम्ही ठरवू शकाल.

✽ उत्पादन किंवा सेवा बाजारात उतरवण्याआधी आपली कल्पना तपासून घ्या. काही ग्राहकांना उत्पादनाची माहिती द्या. तुमची उत्पादनं किंवा सेवा त्यांना वापरायला द्या. त्यांच्याकडून सूचना मागवा. उत्पादनांमध्ये काही सुधारणा करायच्या असतील तर तसा विचार करा.

✽ यानंतर तुमच्या उत्पादनाला किंवा सेवेला नाव द्या. मार्केटिंगचं तंत्र जुळवा. लवकरात लवकर उत्पादन बाजारात आणा.



## उशाखाली मोबाईल ठेवणे धोकादायक

**टेक्नोहेल्थ**

जागतिक आरोग्य संघटना आणि इतर मोठ्या संस्थांना मोबाईल फोनच्या रेडिएशनमुळे मेंदूला थेट गंभीर नुकसान होत असल्याचा कोणताही ठोस वैज्ञानिक पुरावा अद्याप मिळालेला नाही. त्यामुळे, मोबाईल जवळ ठेवून झोपण्यामुळं रेडिएशनचा धोका नसला, तरी अन्य धोके दुर्लक्षून चालणार नाहीत. सध्या बहुतांश लोक झोपतानादेखील मोबाईल उशाशी ठेवतात; पण ही सवय आरोग्यासाठी घातक ठरू शकते. मोबाइलमधून निघणाऱ्या रेडिएशनचा आपल्या मेंदूवर आणि झोपेच्या गुणवत्तेवर परिणाम होऊ शकतो.

**मोबाईल जवळ ठेवून झोपल्याने काय होतं?**

✽ सतत नोटिफिकेशन्स, वायब्रेशन किंवा लाईटमुळे मेंदू सतत ॲक्टिव्ह राहत असल्याने झोप पूर्ण होत नाही.

✽ मोबाइल फोनमधून निघणाऱ्या इलेक्ट्रोमॅग्नेटिक रेडिएशनमुळे मेंदूवर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.

✽ झोपण्याआधी मोबाईल स्क्रीनकडे पाहिल्याने 'ब्लू लाइट' डोळ्यांवर ताण आणतो आणि झोपेच्या नैसर्गिक चक्रात अडथळा निर्माण होतो.

✽ झोपेच्या कमतरतेमुळे चिडचिड, डिप्रेशन, चिंता यासारख्या मानसिक त्रासांची शक्यता वाढते.

✽ काही घटनांमध्ये मोबाईल गरम होऊन स्फोट झाल्याच्या बातम्या समोर आल्या आहेत. त्यामुळे चार्जिंगवर असलेला मोबाईल उशाशी ठेवणं धोकादायक ठरू शकतं.

**काय काळजी घ्याल?**

रेडिएशनचा मोठा बागुलबुवा खरा नसला तरी, शांत आणि सुरक्षित झोपेसाठी काही गोष्टी लक्षात ठेवणं गरजेचं आहे. शक्य असल्यास, रात्री झोपताना मोबाईल तुमच्यापासून थोडा दूर ठेवा. तो उशाखाली किंवा कोणत्याही कापडाखाली, विशेषतः चार्जिंगला असताना, अजिबात ठेवू नका. झोपण्यापूर्वी काही वेळ मोबाईल न बघितल्यास शांत झोप लागण्यासही मदत होते.

